७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. ०१ जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १५६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# मनोज जरांगेंनी १५ तासांत उपोषण सोडलं

**जालना (दै. संध्या)**



मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी आमरण उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडवण्यात राज्य सरकारच्या शिष्टमंडळाला यश आलं आहे. राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप आमदार प्रसाद लाड रात्री 1 वाजून 40 मिनिटाला जरांगे यांच्या भेटीसाठी दाखल झाले होते. यावेळी सरकारने सर्व मागण्या मान्य केल्यानंतर अखेर जरांगे पाटील उपोषण स्थगित करण्यास तयार झाले. मध्यरात्री सुमारे एक तासभर चर्चा केल्यानंतर समाजबांधवांशी संवाद साधत मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणाला स्थगिती देत असल्याची घोषणा केली. त्यानंतर 'एक मराठा, लाख मराठा'ची जोरदार घोषणाबाजी झाली आणि जरांगे पाटील यांनी आपले उपोषण स्थगित केले. ज्या मागण्या जरांगे पाटील यांनी सरकारकडे केल्या होत्या त्या तात्काळ पूर्ण करणार असल्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आश्वस्त केलं आहे. उपोषणाच्या पहिल्याच दिवशी सरकारच्या वतीने मंत्री राधाकृष्ण विखे पाटील अंतरवाली सराटी येथे दाखल झाले. मात्र केवळ चर्चा नको, तर ठोस निर्णय हवा, अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांशी व सरकारशी चर्चा करून पुन्हा संध्याकाळी येण्याचे आश्वासन देत विखे पाटील छत्रपती संभाजीनगरकडे रवाना झाले. मनोज जरांगे हे रखरखत्या उन्हात उपोषणाला बसल्याने राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो मराठा समाज बांधव अंतरवाली सराटी येथे दाखल झाले आणि त्यांनी आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. अखेर रात्री उशिरा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार प्रसाद लाड हे अंतरवाली सराटी येथे दाखल झाले. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी सरकारपुढे ठेवलेल्या 12 प्रमुख मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मराठा आंदोलनादरम्यान समाजबांधवांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेणे, सातारा संस्थान गॅझेट, हैदराबाद गॅझेटसंदर्भातील मागण्या तसेच राज्यामध्ये 58 लाख नोंदी मराठा समाज बांधवांच्या कुणबी असल्याच्या सापडल्या असल्याचा सरकारचा आकडा आहे, मात्र प्रत्यक्षात प्रमाणपत्र दिले जात नाही आणि ज्यांना प्रमाणपत्र दिले आहे, त्यांना प्रमाणपत्र व्हॅलिडिटी मिळत नाही , ओबीसी मधून नोकऱ्या मिळालेल्या मुलांना अद्याप संबंधित विभागाने रुजू करून घेतलेलं नाही , यासारख्या इतर विविध मागण्या सरकारसमोर जरांगे पाटील यांनी मांडल्या व त्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या सर्व मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असल्याचे शिष्टमंडळाने स्पष्ट केले. सुमारे 1 तास चाललेल्या चर्चेनंतर मागण्यांबाबत लेखी आश्वासन सरकारच्या वतीने देण्यात आले आणि त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी मराठा अभ्यासक आणि उपस्थित समाजबांधवांशी चर्चा करून उपोषण स्थगित करण्याची घोषणा मध्यरात्री 1वाजून 40 मिनिटांनी केली.

## उपोषण सोडल्यानंतर मनोज जरांगे रुग्णालयात दाखल

सरकारच्या शिष्टमंडळाला मनोज जरांगे पाटील यांचं उपोषण सोडवायला अखेर यश आलं आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व प्रसाद लाड यांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. उपोषण सोडल्यानंतर मनोज जरांगे यांना छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# अल्पसंख्याक विकास विभागातील ४०६ रिक्त पदे भरा : आमदाराचे पत्र

**मुंबई (दै. संध्या)**



राज्याच्या अल्पसंख्याक विकास विभागातील 406 पदे अनेक वर्षे रिक्त असून त्याचा या विभागाच्या योजना राबवण्यात अडथळा येत आहे. त्यामुळे रिक्त पदे तातडीने भरावीत, मार्टी संस्थेच्या कामास गती द्यावी, भिवंडीतील उर्दू घराचा प्रस्ताव मार्गी लावावा आदी 12 मागण्या समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री व अल्पसंख्याक विभागाच्या मंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केल्या आहेत. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी 1978 क्रमांकांच्या लक्षवेधी सूचनेच्या कार्यवाहीबाबत सोमवारी मुस्लीम आमदारांची बैठक बोलावली आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी अल्पसंख्याक विकास विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर मुस्लीम आमदारांची बोलावलेली ही पहिलीच बैठक आहे. यासंदर्भात माहिती देताना आमदार रईस शेख म्हणाले की, या विभागातील 406 पदे अनेक वर्षे रिक्त आहेत. तसेच अल्पसंख्याक आयुक्तालयातील 36 आणि जिल्हा कार्यालयातील 85 नवी पदे अद्याप भरलेली नाहीत. अल्पसंख्याक संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेचे कामकाज अद्याप सुरळीत झालेले नाही. भिवंडीतील उर्दू घराचा प्रस्ताव सादर केला आहे, मात्र काम प्रत्यक्ष सुरु नाही. तसेच लोकराज्य मासिकाची उर्दू आवृत्ती तातडीने सुरु करण्याची गरज आहे. आमदार रईस शेख पुढे म्हणाले की, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक कर्जाच्या अटी शिथील करण्याची मागणी अनेक वर्षे प्रलंबित आहे. उर्दू साहित्य अकादमीच्या अधिक्षक व कार्यकारी अधिकाऱ्यांना आर्थिक अधिकार दिलेले नसून या कार्यालयाच्या नूतनीकरणाची बाब प्रलंबित आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

# येत्या १० दिवसात शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार : दत्तात्रय भरणे

**अहिल्यानगर (दै. संध्या)**



अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या 301 व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शेतकऱ्यांसाठी एक मोठी आणि दिलासादायक घोषणा केली आहे. राज्य सरकारने राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर केली असून, येत्या 8 ते 10 दिवसांत या कर्जमाफीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली जाईल, अशी महत्त्वपूर्ण माहिती भरणे यांनी याप्रसंगी दिली. दत्तात्रय भरणे म्हणाले, सर्वात महत्त्वाची या वर्षीची गोष्ट म्हणजे या राज्याचे मुख्यमंत्री यांनी आपल्या सर्वांना माहिती आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या नावाने या वर्षी शेतकऱ्यांची कर्जमाफी त्यांनी जाहीर केली आहे. येणाऱ्या आठ-दहा दिवसांत अहिल्यादेवींच्या नावाने दहा दिवसात कर्जमाफी केली जाईल.

एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि सुनेत्रा वहिनी यांची परवानगी घेऊन मी आपल्या सगळ्यांना सांगतो, असे भरणे म्हणाले. पुढे बोलताना दत्तात्रय भरणे म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी त्या काळात जलसंधारणाचे काम आणि त्यांचे विचार आजही मार्गदर्शक आहेत. तसेच एका इंग्रजी लेखकाचा संदर्भ देत भरणे म्हणाले, जेव्हा जगातील महान स्त्रियांचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा अहिल्यादेवींचे नाव प्रथम स्थानी असेल. तर चौंडी गावाचा आणि परिसराचा विकास करण्यासाठी साधारण 1200 ते 1300 कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. पुढील 2-3 वर्षात या भागाचे चित्र पूर्णपणे बदलेल. तसेच हा आराखडा तयार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मोठे सहकार्य केल्याचे भरणे यांनी यावेळी सांगितले.

# शिवसेनेच्या आमदारांनी युतीधर्म पाळावा : एकनाथ शिंदे

**मुंबई (दै. संध्या)**



कोकण विधान परिषदेची जागा राष्ट्रवादीला गेल्यानंतर आता शिवसेना आमदारांनी युतीधर्म पाळावा अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार आणि नेत्यांना दिल्या. कोकणच्या जागेवरून एकनाथ शिंदे यांनी कोकणच्या आमदार आणि पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. एकनाथ शिंदेंच्या सूचनेनंतर आता राष्ट्रवादीचे उमेदवार अनिकेत तटकरे यांचा उमेदवारी अर्ज भरताना एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे. एकनाथ शिंदे यांनी बोलावलेल्या या बैठकीला शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार निलेश राणे, विकास गोगावले आणि मंत्री भरत गोगावले हे उपस्थित होते. कोकणची जागा आता राष्ट्रवादीला गेली असल्यामुळे शिवसेनेच्या आमदारांनी आणि पदाधिकाऱ्यांनी युती धर्म पाळावा अशा सूचना देण्यात आल्या आहेत. कोकणची जागा जरी राष्ट्रवादीला गेली असली तरी त्या बदल्यात शिवसेनेला रायगडचे पालकमंत्रिपद मिळणार की नाही याबाबत मात्र कोणतीही स्पष्टता नाही.

महायुतीत विधान परिषदेच्या जागावाटपाचं त्रांगडं अखेर सुटलं आहे. अर्ज भरण्यासाठी सोमवारी शेवटचा दिवस असताना महायुतीने त्यांच्या जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर केला. एकूण 17 जागांमध्ये भाजप 11 जागा लढवणार आहे. त्यापाठोपाठ शिवसेना 4 जागांवर लढणार आहे. तर राष्ट्रवादीच्या वाट्याला दोन जागा आल्या आहेत. विधान परिषदेच्या 17 जागांपैकी किमान सात जागा या आपल्याला मिळाव्यात यासाठी शिवसेनेचे प्रयत्न सुरू होते. शिवसेनेतील वरिष्ठ नेत्यांनी त्यासाठी चांगलाच जोरही लावला होता. जागावाटपाच्या या चर्चा दिल्लीपर्यंतही गेल्या. मात्र, शिवसेनेच्या वाट्याला अवघ्या ४४ जागा आल्या आहेत. यामध्ये ठाणे, नाशिक, परभणी आणि यवतमाळच्या जागेचा समावेश आहे.

यासोबत सुरुवातीला राष्ट्रवादीला केवळ एक जागा मिळणार, अशी चर्चा होती. मात्र, आता अंतिम जागावाटपानुसार राष्ट्रवादीच्या वाट्याला पुणे आणि कोकण या दोन जागा आल्या आहेत. केंद्रातील नेत्यांच्या चर्चेनंतरच या महायुतीच्या जागावाटपावर शिक्कामोर्तब झालं आहे.

कोकणची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सुटल्यानं खासदार सुनील तटकरेंचे सुपुत्र अनिकेत तटकरेंनी उमेदवारी अर्ज घेतला. ते सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. जागावाटपात कोकणाची जागा राष्ट्रवादीला सुटली असली तरी शिवसेनेनंही या जागेवर दावा केला होता. शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवींची कन्या जुईली दळवी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे त्या अर्ज मागे घेणार का याकडे लक्ष लागलं आहे. या जागेसाठी शिवसेनेचे नेते भरत गोगावलेंचे पुत्रही इच्छुक होते. त्यामुळे कोकणची जागा राष्ट्रवादीला सुटल्यानं शिवसेनेचे भरत गोगावले काय निर्णय घेणार? याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे. दरम्यान, एकनाथ शिंदेंच्या निर्णयापुढे आम्ही जाणार नाही अशी प्रतिक्रिया मंत्री भरत गोगावलेंनी दिली. तर एकनाथ शिंदे दिलखुलास नेतृत्व असं म्हणत सुनील तटकरेंनी एकनाथ शिंदेंचं कौतुक केलं.

## ढिंग-टांग




## श्रीक्षेत्र चौंडीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा ३०१वा जयंती महोत्सव

# अहिल्यादेवींच्या विचारांचा वारसा समाजाने अंगीकारण्याची गरज : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**अहिल्यानगर (दै. संध्या)**



छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या मूल्यांचा प्रसार अहिल्यादेवींनी आपल्या कार्यातून देशभर केला. त्यांनी अंधश्रद्धेला कधीही थारा दिला नाही आणि समाजाला योग्य दिशा दाखविण्याचे कार्य केले. त्यांच्या विचारांचा वारसा अंगीकारण्याची समाजाला गरज आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंती महोत्सवात उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. याप्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार रामराव वडकुते, आमदार सर्वश्री काशिराम दाते, मोनिका राजळे, सुनील कर्जतकर, गोपीचंद पडळकर, विठ्ठलराव लंघे, किरण लहामटे, हेमंत ओगले, अमोल खताळ, अक्षय कर्डिले, उत्तमराव जानकर, नारायण पाटील, बाबासाहेब देशमुख, सचिन कांबळे, तसेच माजी मंत्री अण्णासाहेब डांगे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आजचा दिवस ऐतिहासिक आहे. महाराष्ट्राचा अभिमान, शौर्य, त्याग व समर्पण यांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे अहिल्यादेवी होळकर होत. चौंडीची माती त्यांच्या जन्माने पावन झाली आहे. त्या न्यायप्रियता आणि शक्तीचे प्रतीक असलेल्या युगप्रवर्तक होत्या. त्यांचा राज्यकारभार आदर्शवत होता. जनतेवर त्यांनी आईप्रमाणे माया केली. तीनशे वर्षांनंतरही देश त्यांचे स्मरण करत आहे. त्यांनी मानवधर्म जपला. अहिल्यादेवींनी अनेक वैयक्तिक आघात सहन केले; मात्र त्यातून खचून न जाता आदर्श राज्यकारभाराचा वस्तुपाठ घालून दिला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे कार्य आपल्याला करायचे आहे. गोदा ते नर्मदा अहिल्यादेवी जलयात्रा शासनाने आयोजित केली. अहिल्यादेवी या दूरदृष्टी असलेल्या राज्यकर्त्या होत्या. त्यांनी समाजाच्या रक्षणासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले.

अहिल्यादेवी या हिंदुत्वाचा हुंकार व शौर्याचे प्रतीक होत्या. त्यांची न्यायप्रियता, लोककल्याणकारी राज्यकारभार व जनसेवेचा वारसा आपल्यासाठी आदर्श आहे. त्यांनी सत्तेपेक्षा सेवेला आणि वैभवापेक्षा जनकल्याणाला प्राधान्य दिले. आपल्या कार्यकाळात देशभरात मंदिरे, घाट, धर्मशाळा व जलसंवर्धनाची अनेक कामे उभी केली. जलसंवर्धन क्षेत्रातील त्यांचे कार्य आजही मार्गदर्शक ठरते. त्यांच्या कार्याचे स्मरण म्हणून जलसंवर्धनाचे विविध उपक्रम राबविले जात आहेत. कुटुंबातील सदस्यांच्या निधनाचे मोठे आघात सहन करूनही त्यांनी स्वतःचे दुःख बाजूला ठेवत कर्मयोगी वृत्तीने जनसेवा केली, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

# मान्सूनचे आगमन लांबणार, पेरणीची घाई करू नये

## हवामान खात्याने आता पावसाची नवी तारीख सांगितली



**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील हवामानात सध्या मोठ्या प्रमाणावर बदल होण्यास सुरुवात झाली आहे. मे महिन्यातील कडक उन्हाच्या झळांनंतर आता 1 जून पासून सुरू होणाऱ्या नवीन आठवड्यात हवामानाचा नूर अधिकच बदलणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, राज्यातील अनेक भागांमध्ये वादळी पावसाची दाट शक्यता आहे. मात्र, हा पाऊस मान्सूनचा नसून मान्सूनपूर्व वादळी पाऊस आहे. सद्यस्थितीनुसार, राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान 10 जून पर्यंत अधिकृत मान्सूनच्या आगमनाची कोणतीही शक्यता नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असं आवाहन हवामान खात्याने केलं आहे.

हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, 1 जूनपासून राज्यातील प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपारनंतर हवामानात मोठे बदल होऊन ढगाळ वातावरण निर्माण होईल. या भागात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. याशिवाय, कोकण किनारपट्टीच्या भागातही काही प्रमाणात पावसाच्या सरी कोसळतील असा अंदाज आहे.

मे महिन्याच्या अत्यंत कडक आणि सुस्त करणाऱ्या उन्हाच्या तुलनेत आता आगामी आठवड्यात राज्यातील कमाल तापमानात काहीशी घट होणार आहे, ज्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून थोडा दिलासा मिळेल. मात्र, विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भात कमाल तापमान अद्यापही 40 अंश सेल्सिअसच्या वरच कायम राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने स्पष्ट केले आहे की, आगामी काळात होणाऱ्या वादळी पावसाचा मान्सूनशी कोणताही थेट संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळमध्येच दाखल झालेला नाही.

१. **पेरणीची घाई टाळा :** शेतकऱ्यांनी 1 जूनपासून सुरू होणाऱ्या केवळ मान्सूनपूर्व वादळी पावसावर अवलंबून राहून आपल्या शेतात पेरणीची घाई करू नये. मान्सूनचे अधिकृत आगमन होऊन पुरेसा पाऊस पडल्याशिवाय पेरणी केल्यास बियाणे वाया जाण्याची भीती असते.
२. **विजांपासून स्वतःचे रक्षण करा :** विजेच्या कडकडाटासह पाऊस सुरू असताना नागरिक आणि शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच आपल्या पाळीव जनावरांची सुरक्षा सुनिश्चित करावी.
३. **'या' ठिकाणी उभे राहू नका :** विजा चमकत असताना विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे. तसेच कोणत्याही मोठ्या झाडाखाली, टिनशेडखाली, विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि उघड्या विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे पूर्णपणे टाळावे.

# संपादकीय

## सक्षम नेत्या, हुशार प्रशासक

**अहिल्याबाई होळकर एक सक्षम नेत्या म्हणून उदयास आल्या. त्यांनी दूरदृष्टीने अनेक सामाजिक कामे केली. एक हुशार प्रशासक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. जलसंधारण, रस्त्यांच्या कडेची झाडे, स्थापत्यकलेतील अनेक कामे त्यांच्या दूरदृष्टीची प्रतीके आहेत. ३१ मे रोजी पार पडणाऱ्या त्यांच्या जयंतीनिमित्त घेतलेला वेध.**

अहिल्याबाई होळकर या भारतीय इतिहासातील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व आहेत. केवळ स्थापत्य चमत्कारांसाठीच नव्हे, तर प्रगतिशील प्रशासनासाठी आणि केलेल्या दूरगामी सामाजिक सुधारणांसाठीही त्या प्रसिद्ध आहेत. १७६७ ते १७९५ पर्यंत राज्य करताना अहिल्याबाईंच्या कारकिर्दीत कल्याण, सामाजिक न्याय, मानवी समानता आणि शाश्वत विकासासाठी अढळ वचनबद्धता होती. त्यांनी उपेक्षित समुदायांना उन्नत करणारी धोरणे आखली. प्रगत शिक्षण दिले. आरोग्यसेवा सुधारली आणि आर्थिक वाढ साधत पायाभूत सुविधांची निर्मिती केली. अठरावे शतक हा भारतातील अशांततेचा काळ होता. त्यात राजकीय विखंडन, आर्थिक आव्हाने आणि सामाजिक अशांतता होती. या वातावरणात अनेक इतिहासकारांनी अहिल्याबाईंच्या बुद्धिमत्तेचे आणि नेतृत्वगुणांचे कौतुक केले. त्यांचे 'शासन आणि व्यक्तिमत्त्व' हे ज्ञान, करुणा आणि न्यायाचे मिश्रण होते. ब्रिटिश इतिहासकार कर्नल जेम्स ग्रँट डफ यांनी त्यांचे वर्णन 'एक अतिशय बुद्धिमान महिला' म्हणून केले आहे. त्यांच्याकडे विवेक आणि निष्पक्षतेने काम करण्याची वृत्ती होती. केवळ प्रादेशिक विस्तारापेक्षा सामाजिक कल्याणाला प्राधान्य देणाऱ्या शासक म्हणून त्यांची अद्वितीय भूमिका अनेक इतिहासकार अधोरेखित करतात. अहिल्याबाईंच्या वारशातील सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे शिक्षणक्षेत्रातील अग्रणी कार्य. सामाजिक सक्षमीकरणासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे, हे माहीत असल्याने, त्यांनी त्यांच्या राज्यात असंख्य शाळा आणि शिक्षण संस्था स्थापन केल्या.

गतीसाठी महिला सक्षमीकरण आवश्यक आहे हे समजून घेतले. 'माझ्या आजीसाठी, मुलीचे शिक्षण हे गरिबीतून बाहेर पडण्याचे तिकीट होते' हा त्यांचा विश्वास लिंग समानतेबद्दलच्या आधुनिक चर्चेत अजूनही प्रतिध्वनित होत आहे. आज, अनेक संघटना आणि चळवळी मुलींसाठी दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतात. शैक्षणिक सुधारणांचा पाया रचून त्यांनी अनेकांचे जीवन बदलले आणि राज्याच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. आरोग्यसेवेतही अहिल्याबाईंचे योगदान उल्लेखनीय होते. त्यांनी सुलभ, स्वच्छ आणि समुदायाभिमुख आरोग्यसेवेची सुरुवात केली. त्या काळात सार्वजनिक आरोग्य ही संकल्पना फारशी प्रचलित नव्हती, तरीही त्यांनी रुग्णालये आणि दवाखाने स्थापन करून लोकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिल्या. स्वच्छतेचा प्रचार करून त्यांनी त्या काळात एक क्रांतिकारी पाऊल उचलले. आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करून त्यांनी लोकांच्या गरजा पूर्ण केल्या आणि पुढील सार्वजनिक आरोग्य उपक्रमांसाठी मार्ग मोकळा केला. त्यांची दूरदृष्टी आजच्या ग्रामीण आणि वंचित घटकांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या सार्वजनिक आरोग्य धोरणांमध्येही दिसून येते. अहिल्याबाई होळकरांच्या कारकिर्दीत रस्ते, पूल आणि सार्वजनिक इमारतींसारख्या पायाभूत सुविधांचा मोठा विकास झाला. यामुळे व्यापार, आर्थिक वाढ आणि सामाजिक संपर्क सुलभ झाला तसेच दुर्गम भाग जोडले गेले. त्यांच्या या गुंतवणुकीमुळे राज्याची समृद्धी वाढली आणि अधिक परस्पर जोडलेला समाज निर्माण झाला. तसेच त्यांनी उपेक्षित समुदायांच्या उन्नतीसाठी विविध कल्याणकारी योजना राबवल्या आर्थिक मदत, निवारा आणि व्यावसायिक प्रशिक्ष त्यांची धोरणे विशेषतः विधवा, अनाथ आणि आर्थिक अडचणींना तोंड देणाऱ्यांसाठी फायदेशीर होती. त्यामुळे असुरक्षित लोकसंख्येला संसाधने आणि संधी उपलब्ध होतील याची खात्री झाली. सामाजिक कल्याणाप्रती अहिल्याबाईंचा दृष्टिकोन समग्र होता. त्यांना माहीत होते, की खऱ्या सक्षमीकरणासाठी आर्थिक पाठबळ आवश्यक आहे; परंतु कौशल्यांचा विकास आणि चांगले सामाजिक एकीकरणदेखील आवश्यक आहे.

## संस्कृत सुभाषित

नास्त्यभक्ष्यं क्षुधितस्य ।।

अर्थ – भुकेलेल्या माणसाचा जगणे हाच धर्म असतो. भुकेने व्याकुळ झालेल्या माणसाला कोणतेही अन्न खाणे अयोग्य वाटत नाही.

## आगामी साप्ताहिकी



१ जून २०२६ सोमवार
२ जून २०२६ मंगळवार
३ जून २०२६ बुधवार
संकष्ट चतुर्थी चंद्रोदय ९.५०
मुंबई २१.५०
अकोला २१.३८
अमरावती २१.३५
अहमदनगर २१.४३
अलिबाग २१.५०
औरंगाबाद २१.४३
कोल्हापुर २१.४०
जळगाव २१.४४
जालना २१.४०
ठाणे २१.५१
धराशिव २१.३६
धुळे २१.४८
नांदेत्रड २१.३२
नागपूर २१.३०
नाशिक २१.४७
पणजी २१.३९
परभणी २१.३५
पुणे २१.४६
बेळगाव २१.३७
बीत्रड २१.३९
बुलढाणा २१.४७
भंडारा २१.२८
भुसावळ २१.४४
यवतमाल २१.३२
रत्नागिरी २१.४५
लातूर २१.३४
वर्धा २१.३१
सांगली २१.३९
सातारा २१.४३
सोलापूर २१.३५
सावंतवाडी २१.४०
४ जून २०२६ गुरुवार
शुभ दिवस
५ ऑगस्ट २०२६ शुक्रवार
जागतिक पार्यवरण दिन
शुभ दिवस
६ जून २०२६ शनिवार
शिवराज्याभिषेक
सोहळ – किल्ले रायगड
७ जून २०२६ रविवार
भानुसप्तमी

## उपदेशकथा

### कुंतीचे मागणे

भारतीय युद्ध संपले होते. धर्मराजाला राज्याभिषेक झाला होता. श्रीकृष्ण द्वारकेला जाण्याचा विचार करू लागला तेव्हा पांडवमाता कुंती त्याला भेटायला आली. श्रीकृष्ण तिला म्हणाला, ''कुंती ! मी आता परत जातो. तुला हवे ते मागून घे.'' तेव्हा कुंती म्हणाली, 'गोविंदा ! जीवनामध्ये माझ्यावर पुन्हा पुन्हा संकटे येऊ देत. तू भगवत्स्वरुप आहेस. संकटात वारंवार तुझे दर्शन घडते.'' हे मागणे ऐकून श्रीकृष्णाने विचारले. ''अगं, जीवनामध्ये दु:खाचे व विपत्तीचे वरदान कुणी मागतो का? हे तू काय मागतेस?'' कुंतीने उत्तर दिले, ''श्रीकृष्णा ! जेव्हा विपत्ती येते तेव्हा तू आमचे रक्षण करण्यास येतोस म्हणून तुझे दर्शन होते. तुझे दर्शन झाले की जीव पुन्हा संसारात रमत नाही पण ते तुझे दर्शन संकटामध्येच होत असते.'' आपला मुलगा राजा झाला हे तिने पाहिले. आता विपत्काल हातचा गेला असे तिला वाटले.

कथा उपदेश : संकटामध्ये ज्या उत्कटतेने ईश्वराचे स्मरण व चिंतन घडते तसे इतर वेळी होत नाही.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:प्रतिपदा १६:३७:२५ |
| १ जून २०२६ | नक्षत्र:ज्येष्ठा १९:०८:१८ |
| सोमवार | योग:सिद्ध ०६:१८:३४ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव १६:३७:२५ |
| अधिक ज्येष्ठशके | करण:तैतिल |
| संवत्– १९४८ | २९:४९:३०+ |
| संवत्सर –पराभवनाम | सूर्य:वृषभ |
| अयन– उत्तरायणारंभ | चन्द्र:धनु१९:०८:१८ |
| मास–अधिक ज्येष्ठ | हिजरी सन् – १४४७ |
| ऋतु– सौर ग्रीष्म | मुस्लिम मास – जिल्हेज |
| कृष्ण पक्ष | तारीख – १५ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९६५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 3 | 8 | | 4 | |
| 8 | 9 | | 4 | | 5 | | | 3 |
| 5 | 4 | | | 9 | | | | |
| | | | | | 6 | 9 | 5 | 1 |
| | 6 | 5 | | 4 | | 3 | 7 | |
| 3 | 8 | 9 | 5 | | | | | |
| | | | | 7 | | | 3 | 2 |
| 7 | | | 9 | | 1 | | 8 | 4 |
| | 1 | | 8 | 2 | | | | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे. या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९६४ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 6 | 9 | 4 | 5 | 2 | 3 | 1 | 8 |
| 4 | 1 | 8 | 9 | 3 | 7 | 5 | 2 | 6 |
| 3 | 5 | 2 | 6 | 8 | 1 | 7 | 4 | 9 |
| 2 | 8 | 5 | 7 | 1 | 4 | 9 | 6 | 3 |
| 6 | 4 | 1 | 5 | 9 | 3 | 8 | 7 | 2 |
| 9 | 3 | 7 | 2 | 6 | 8 | 4 | 5 | 1 |
| 1 | 9 | 4 | 8 | 7 | 6 | 2 | 3 | 5 |
| 8 | 2 | 6 | 3 | 4 | 5 | 1 | 9 | 7 |
| 5 | 7 | 3 | 1 | 2 | 9 | 6 | 8 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### राष्ट्रीय

- १९२९ – प्रभात फिल्म कंपनीची कोल्हापूर येथे स्थापना.
- १९४५ – टाटा मूलभूत संशोधन संस्थेची भारतीय विज्ञान संस्थेच्या परिसरात स्थापना.
- २००७ – अनुसूचित जमातीत आरक्षणाचा विरोध आणि समर्थनात दौसाच्या लालसोटूमध्ये गुर्जर आणि मीना या दोन समूदायातील संघर्षात ८ जण ठार झाले.

### आंतरराष्ट्रीय

- ०१९३ – रोमन स्म्राट डिडियस ज्युलियानसची हत्या.
- १४८५ – हंगेरीचा राजा मथियासने ऑस्ट्रियातील व्हियेना शहर जिंकले वा तेथे आपली राजधानी वसवली.
- १४९५ – फ्रायर जॉन कॉरने सर्वप्रथम स्कॉच व्हिस्की तयार केली.
- १६६० – अमेरिकेच्या मॅसेच्युसेटस प्रांतात बंदी असताना क्वेकर धर्म पाळल्याबद्दल मेरी डायरला फाशी.
- १७९२ – केंटकी अमेरिकेचे १५वे राज्य झाले.

### जन्म

- १८६६ – अमेरिकन वैज्ञानिक चार्ल्स डेवनपोर्टचा जन्म.
- १९५० – अमिरेकी नेता टीम बीशपचा जन्म.
- १९६४ – भारताच्या वेगवान गोलंदाज रशीद पटेलचा जन्म.

### निधन

- १९३४ – श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नाटककार आणि विनोदी लेखकाचे निधन.
- १९९६ – नीलम संजीव रेड्डी, भारतीय राष्ट्रपतीचे निधन.
- १९९८ – गो. नी. दांडेकर, मराठी कादंबरीकारचे निधन.
- २००७ – रा.कृ. दादासाहेब पाटील, ज्येष्ठ गांधीवादी नेते आणि वयोवृद्ध स्वातंत्र्यसंग्राम सैनिक यांचे निधन.

## : SMS :

Bipasha Bharat
ke har nagrik
ka adikar he,
Bipasa har kisiki
jaruriyat he,
Bipasha har kisiko
milni chahiye,
Bi-Bijli
Pa-Pani
Sha-Shadak

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.६ | २५.१ |
| अहमदनगर | ३७.८ | २४.९ |
| अकोला | ४२.२ | २९.७ |
| अमरावती | ४२.९ | २९.१ |
| बीड | ४६.७ | ३२.५ |
| भंडारा | ४४.६ | ३०.७ |
| बुलढाणा | ३७.३ | २५.८ |
| चंद्रपूर | ४६ | ३२ |
| चेन्नई | ४६.१ | ३५ |
| नवी दिल्ली | ३८.२ | २८.९ |
| धुळे | ४२ | २७.३ |
| गोंदिया | ४३.२ | ३२ |
| जळगाव | ४१ | २८.८ |
| कोल्हापूर | ३८.४ | २५.२ |
| लातूर | ३८.३ | २५.८ |
| मुंबई | ४२.५ | ३७.५ |
| नागपूर | ४३.६ | ३०.६ |
| नांदेड | ३९.७ | २८.८ |
| नंदूरबार | ३८.६ | २६.१ |
| नाशिक | ३७.३ | २५.५ |
| पुणे | ३६.२ | २४.८ |
| पंढरपूर | ४१.८ | २६.८ |
| सातारा | ३८.७ | २५.१ |
| सांगली | ४०.१ | २५.१ |
| सोलापूर | ४०.६ | २७.२ |
| वर्धा | ४४.९ | २९.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पूर्व राजकीय कामे हातावेगळी होतील. उपयुक्त सल्ला मिळेल.

**तुळ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**वृषभ :** शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा: पूर्व वाद विवाद किंवा भांडणामुळे आपले मानसिक संतलुन बिघडेल. व्यापार मध्यम राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर कार्याचा विस्तार वाढून अनकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल.

**मिथुन :** शुभ रंग–केसरी, शुभ दिशा:पूर्व मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल.

**धनु :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:दक्षिण कुटुंबात मोठ्यांचे मार्गदर्शन मिळेल. कायद्यातील वादाचा निपटारा होईल. आर्थिक योग उत्तम आहेत.

**कर्क :** शुभ रंग,पांढरा, शुभ दिशा:पूर्व न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत.

**मकर :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर व्यवसायात फायदा होईल त्यामुळे मन प्रसन्न राहील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील.


**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील.

**कुंभ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर सामाजिक मान सन्मान मिळाल्याने आनंदी राहील. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील.

**कन्या :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल.

**मीन :** शुभ रंग : पिवळा,शुभ दिशा:उत्तर कौटुंबिक किंवा मालमत्ते विषयाच्या समस्या दूर होतील. पराक्रमामुळे विरोधक त्रस्त होतील. कर्ज घेण्यापासून दूर रहा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९६५



**आडवे शब्द**

१.महेश मांजरेकर दिग्दर्शीत संजय दत्त,महीमा चौधरी यांचा एक हिंदी चित्रपट
४.महेश कोठारे,लक्ष्मीकांत बेर्डे यांचा एक चित्रपट
८.कमतरता,मुळीच नसणे
१२.दशरथ पुत्रापैकी एक
१३.स्तुती,वाहवा
१५.डाव्या हाताने काम करणारा
१६.बुध्दीबळातल्या खेळातील मुख्य सोंगटी,हाजीर तो ....... एक म्हण
१८.पती,दादला
२०.पान,दल
२१.मारणारा
२२.निकाह चित्रपटातील एक नायिका' .........आगा'
२४.विचार,अभिप्राय
२६.साळगांवकरांची एक प्रसिध्द दिनदर्शीका
२८.चंद्राचा सोळावा भाग
२९.श्रीगणेश,पार्वती नंदन
३२.बारीक सारीक पाहणी
३४.वजा,कमी करणे
३५.वर्तूळ,रिंगण
३६.सारखा,सम
३८.चिखलात उमलणारे एक फुल
३९.नभ,गगन
४०.संत रामदास स्वामींची समाधी या गडावर आहे
४२.भरपुर,विपुल
४४.हिंदीत शपथ
४६.पराजय,माळ
४७.आकलन होईल असे
४९.शंकराचे एक वादय
५०.जामखीळ
५२.मीग उलटे करा
५३.आवश्यकता, गरज
५४.पाहुणा,मालक,पती
५६.केरसूणी,फडा
५७.लकाब उलटे करा
५८.चाळीस कागदाचा गठठा
५९.देवाला घातलेले साकडे
६०.गाजावाजा, बोभाटा
६३.बिपाशा बासूचा ' आपके प्यार मे हम संवरने लगे' या गीताचा एक भयपट
६५.वंदता,अफवा
६६.प्रत्यक्ष ताडुन पाहणे
६७.अती उच्च,परम
६९.आपल्या राष्ट्रगिताची सूरूवात
७२.पदार्थाचा तोडलेला तुकडा
७३.हिंदीत वचन
७४.इंग्रजीत बंदुक
७५.भारताच्या उत्तरेकडील एक प्रदेश
७९.नरामध्ये सरस असलेला
८०.भारी,हलका नसलेला
८१.काठ,बाण,शर

**उभे शब्द**

१.खोडी
२.इंग्रजीत खोली
३.त्रासलेला
४.मनुस्य
५.तपास,शोध
६.ऐपत,धमक
७.वेस्ट इंडीज चा एक खेळाडु ब्रायन ......
८.ज्याचे वर्णन करता येणार नाही असे
९.कालवण,हिरवे पाले ....खाणे आरोग्यासाठी चांगले असते
१०.नवरदेवाची आई
११.शासन,सत्ता
१४.जंगलातल्या फ ुलांचा हार
१७.फळातील द्रव
१९.एकच प्याला या प्रसिध्द नाटकाचे लेखक
२०.क्षण, . '.... भर के लिए कोई हमे प्यार कर ले झुठा ही सही.' देव आनंद –हेमा मालिनी यांचे एक गीत
२३.एक वात रोग
२५.शरीर,गवत
२६.मारक,खुन करणारा हिंदीत
२७.मनोरंजन
३०.वारा,हवा
३१.मेंढपाळ
३२.लहान मुल,बालक
३३.कावळा
३४.उ ला ...... ऊस
३६.तयार,सावध
३७.बदनामी,नामुश्की
४०.सारख्या प्रमाणात
४१.शिवाजी महाराजांचा प्रसिध्द कावा
४३.कोलकात्याचे विमानतळ
४५.तंबी,समजावणे
४७.मुलाचे एक नाव
४८.घाई,त्वरा
५१.दादा कोंडके यांचा एक प्रसिध्द चित्रपट
५४.यमांचा राजा
५५.आश्चर्य
६१.जड,हलके नसलेला
६२.मुख,तोंड
६४.एक भारतीय क्रिकेटपटु ......... श्रीनाथ
६५.श्रीविस्णुचा एक अवतार,बुटका मानव
६७.करा,मंगल जल .......
६८.तपास,मागोवा
६९.तरूण,सैनिक
७०.मोठे शहर
७१.श्रीविस्णुचे वाहन असलेला पक्षी
७५.बोकड
७६.चामडी,कातडे
७७.नकल
७८.हिंदीत उशीर

**जम्बो शब्दकोडे क्र. ९६४ चे उत्तर**

आडवे उत्तर
१.विदूषक
३.बातमीदार
७.जमापावती ९.नाही
१०.जांभया ११.वेगवान
१३.शतावरी १६.कुंदा
१७.चाकरचुकर
२१.रीत २३.रटाळ
२५.चकटफू २७.सरहद्द
२९अ.अवसर ३१.हरामखोर
३२.कटाप ३३.पालव
३४.टपणे ३६.सटरफटर
३९.नवलाई ४२.कावा
४२अ.रफ ४४.राकट ४५अ.पट ४६.एकाटक ४८.चराचर
५०.फणकारा ५२.कणेर
५३.कबरा
५४.रक्तदान ५६अ.मोहक ५७अ.कसेल
त्याची जमीन ६१.तडकफडक
६४.सम ६६.बालंट
६८.पदोपदी ६९.जनार्दन
७१.किक ७२.सर ७३.मोती
७४.कपटी ७५.रसातळ
७६.मत

उभे उत्तर : १.विनाशक
२.दुहिता ३.बाभळी
४.तया ५.दावेदार ६.राग
७.जनक ८.पाल चुकचुकणे
१२.वाचाळ १४.वरी
१५.रीतसर १८.रच १९.कट
२२.जिद्द २४.टालमटोला
२६.घाव २८.हद्दपार २९.खारट
२९अ.अवस ३०.समीर
३१.हवन ३२अ.पळवाट
३५.पलटण ३७.टरकणे
३८.फरक ३८अ.टफ
४०.वनचर ४१.ईरा ४२.कापरा
४३.कचरा ४५.कफन ४६.एक
४७.टरफल ४९.रक्तपात
५१.काडीमोड ५३.कपची
५५.चीक ५६.सनसनाटी
५७.हक ५८.सेनापती
५९.त्यागपत्र ६०.जड
६१अ.डबा ६२.कलंकित
६३.फटकळ ६५.मर्द
६७.भारत ६९.जप ७०.नर
७२.सर

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुणे शहरात गुन्हेगारी वाढण्यास पोलिस आयुक्तच जबाबदार - सुप्रिया सुळे

पुणे (दैनिक संध्या) : शिक्षणाचे माहेरघर असलेले पुणे शहर आता क्राईम कॅपिटल झाले असून, केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अहवालानुसार पुणे हे गुन्हेगारीच्या बाबतीत देशात पाचव्या आणि राज्यात पहिल्या क्रमांकावर आहे. शहरात गुन्हेगारीच्या घटना वाढण्यास पोलिस आयुक्तच जबाबदार आहेत, असा आरोप राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. तसेच पोलिस आयुक्तांची तातडीने बदली करावी किंवा त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे, अशी मागणीही सुळे यांनी केली. शहर व परिसरात वाढत्या गुन्हेगारीच्या घटना आणि विषारी दारूमुळे झालेले नागरिकांचे मृत्यू या पार्श्वभूमीवर खा. सुळे यांनी शनिवारी माध्यमांशी संवाद साधला. त्या म्हणाल्या, शहरात कोयता गँग मोकाट फिरते, हल्ले,मारहाण, महिला व मुलींवर अत्याचार अशा गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. हे पुणे पोलिसांचे आणि गृह विभागाचे अपयश आहे. मुंबई, नागपूर, जळगाव, नाशिक, संभाजीनगर याठिकाणी सर्व दुकाने व व्यवसाय सुरू असताना केवळ पुण्यात पोलिस रात्री दुकानदार व व्यावसायिकांना दमदाटी करून दुकाने बंद करायला भाग पाडतात. या सर्व गोष्टींना पोलिस आयुक्तच जबाबदार असून, त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवणे किंवा त्यांची बदली करणे गरजेचे आहे. या सर्व घटनांमध्ये पालकमंत्र्यांनी लक्ष घातले असेल. मात्र, आमच्या मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहेत, असेही खा. सुळे म्हणाल्या. पुण्यात सुधारणा नाही झाली तर रस्त्यावर उतरू, असा इशाराही त्यांनी दिला.



### इंडिगोच्या गुवाहाटी विमानात मिळाली ‘बॉम्ब’ लिहिलेली चिठ्ठी

पुणे (दैनिक संध्या) : हडपसर येथील एका खासगी रुग्णालयात बॉम्ब ठेवण्यात आल्याची घटना ताजी असतानाच आता पुण्याहून गुवाहाटीला जाणाऱ्या विमानातील प्रसाधनगृहात ‘बॉम्ब’ असे लिहिलेली चिठ्ठी सापडल्याने सर्वांचेच धाबे दणाणले. चिठ्ठी सापडल्यानंतर संपूर्ण विमानाची तपासणी करण्यात आली. मात्र, कोणतीही आक्षेपार्ह वस्तू मिळून आली नसल्याने विमानतळ अधिकाऱ्यांनीही सुटकेचा नि:श्वास सोडला. याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. इंडिगो विमान कंपनीचे सहायक सुरक्षा प्रमुख विशालकुमार श्रीवास्तव (वय ३०, रा. लोहगाव) यांनी विमानतळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंडिगो कंपनीचे पुणे ते गुवाहाटी हे विमान २९ मे रोजी सकाळी ७ वाजता आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण घेणार होते. विमानात प्रवासी बसलेले असताना त्या विमानात काम करणाऱ्या एअरहोस्टेसला विमानाच्या लेव्हीटरीमध्ये एका पांढऱ्या रंगाच्या पेपरच्या तुकड्यावर ‘बॉम्ब’ असे लिहिलेली चिठ्ठी सापडली. तिने ही चिठ्ठी लीड केबीन क्रू यांच्या ताब्यात दिली. पहाटे ६ वाजून ४४ मिनिटांनी याची माहिती सुरक्षा विभागाला दिल्यानंतर प्रवाशांना खाली उतरविण्यात आले. तसेच कंपनीच्या अभियंत्यांनी विमान आयसोलेशनला नेले. विमानाची बीडीडीएस पथक, एअर लाईन इंजिनिअरिंग पथक, एअर लाईन्स सिक्युरिटी पथकाकडून तपासणी करण्यात आली. त्यात विमानात कोठेही आक्षेपार्ह वस्तू आढळून आली नाही. विमानामध्ये तसेच लेव्हीटरीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने ती चिठ्ठी कोणी लिहिली हे समजू शकलेले नाही. कागदाच्या तुकड्यावर बॉम्ब असा धमकीचा संदेश लिहून प्रवाशांची सुरक्षा धोक्यात आणून भीतीचे वातावरण निर्माण केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक कांतीलाल गुंड तपास करीत आहेत.

### धायरीतील निकृष्ट रस्ताकामावर महापालिकेची कारवाई

पुणे (दैनिक संध्या) : धायरी परिसरात समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत झालेल्या रस्त्याच्या पुनर्बांधणीच्या कामात गंभीर त्रुटी आढळून आल्याने संबंधित ठेकेदारावर महापालिकेने 10 लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी शनिवारी प्रत्यक्ष स्थळाची पाहणी करीत निकृष्ट दर्जाचे काम उघडकीस आणले आणि तातडीने दंडात्मक कारवाईचे आदेश दिले. समान पाणीपुरवठा योजनेची कामे अंतिम टप्प्यात असताना शहरातील विविध भागांमध्ये जलवाहिन्या टाकण्याचे काम सुरू आहे. मात्र, या कामांनंतर रस्ते पूर्ववत करण्यासाठी करण्यात येणाऱ्या सिमेंट काँक्रिटीकरणाच्या दर्जाबाबत सातत्याने तक्रारी होत आहेत. धायरीतील उंबऱ्या गणपती परिसरात दोन महिन्यांपूर्वी जलवाहिनी टाकण्यात आली होती. त्यानंतर खोदलेला रस्ता दीर्घकाळ दुरुस्त न करता तसाच ठेवण्यात आला होता. दरम्यान, मंगळवारी (दि. 26 मे) रात्री संबंधित ठिकाणी सिमेंट काँक्रीट टाकून रस्ता पूर्ववत करण्याचे काम करण्यात आले. मात्र, काँक्रीट टाकल्यानंतर ते व्यवस्थित सुकावे आणि त्यावर वाहनांची ये-जा होऊ नये, यासाठी आवश्यक खबरदारी घेण्यात आली नाही. परिणामी, काही तासांतच नव्याने केलेल्या काँक्रीटचा थर उखडण्यास सुरुवात झाली. या प्रकाराची दखल घेत आयुक्त नवल किशोर राम आणि अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी शनिवारी घटनास्थळी भेट दिली. पाहणीदरम्यान संबंधित ठेकेदार कंपनीने काँक्रीटवर पोती टाकून काम झाकण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. मात्र, ती पोती हटविल्यानंतर कामाचा निकृष्ट दर्जा स्पष्टपणे समोर आला. अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर यांनी स्वतः काँक्रीटची स्थिती तपासून कामात गंभीर त्रुटी असल्याचे निदर्शनास आणले. त्यानंतर आयुक्तांनी पाणीपुरवठा विभागप्रमुख नंदकिशोर जगताप यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून संबंधित ठेकेदारावर 10 लाख रुपयांचा दंड आकारण्याचे निर्देश दिले. याशिवाय, निकृष्ट दर्जाचे झालेले रस्त्याचे काम ठेकेदाराकडून पुन्हा करून घेण्यात येणार असून, गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचा इशाराही महापालिका प्रशासनाने दिला आहे.

# 'रसायू'च्या माध्यमातून आयुर्वेद संशोधनाचे कार्य

## गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे प्रतिपादन; रसायू लाईफ सायन्सेसच्या कर्वेनगर येथील नूतन वास्तूचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या)

"हजारो वर्षांची परंपरा असलेल्या आयुर्वेदाला २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजाश्रय दिला आणि स्वतंत्र आयुष मंत्रालयाची स्थापना करून आयुर्वेदशास्त्राच्या संशोधनासाठी मार्ग मोकळा केला. वैद्य योगेश आणि वैद्य विनीता बेंडाळे यांची रसायू लाईफ सायन्सेस ही संस्था, आयुर्वेदातील संशोधनावर आधारित औषधांसाठी सकारात्मक कार्य, जागतिक मान्यताप्राप्त प्रमाणित नवी औषधे संशोधित करत आहे, हे अभिमानास्पद आहे. या नव्या वास्तूच्या माध्यमातून आयुर्वेद संशोधनाचे कार्य अधिक गतिमान होईल," असे प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळ आयुर्वेदाला संशोधन व तंत्रज्ञानाची जोड देत हजारो रुग्णांना बरे करणाऱ्या रसायू लाईफ सायन्सेस या संस्थेच्या नूतन वास्तूचा उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. डॉ. सावंत यांच्या हस्ते आणि विज्ञान-तंत्रज्ञान विषयक संसदीय स्थायी समितीच्या अध्यक्षा व राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला. कर्वेनगर येथील संस्थेच्या वास्तूत झालेल्या सोहळ्यात निमंत्रक वैद्य योगेश बेंडाळे, वैद्य विनिता बेंडाळे उपस्थित होते. दीपप्रज्वलन आणि धन्वंतरी पूजन व स्तवनाने कार्यक्रमाचा आरंभ झाला.

डॉ. प्रमोद सावंत म्हणाले, "आयुर्वेदाला पाच हजार वर्षांहूनही मोठी परंपरा आहे. मात्र, मध्यंतरीच्या काळात आयुर्वेद दुर्लक्षित राहिला. अगदी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावरही आयुर्वेदाकडे योग्य तसे लक्ष दिले गेले नाही. केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार येताच, परिस्थिती बदलली. आयुष मंत्रालयाच्या निर्मितीने, आयुर्वेद संशोधनाला राजाश्रय मिळाला आणि संशोधनाने गती घेतली. बेंडाळे यांनी ३० वर्षांहून अधिक काळ सुरू ठेवलेले संशोधन, डाटा, केस स्टडीज आणि आधुनिक काळातील पर्सनलाईज मेडिसीन या संकल्पनेचे आयुर्वेदाशी असलेले नाते यांचा मेळ कौतुकास्पद आहे. विशेषतः कर्करोगाच्या विविध प्रकारांवर बेंडाळे यांचे संशोधन मोलाचे आहे."



प्रा. डा. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "बेंडाळे हे लोकसेवेचे व्रत घेऊन आयुर्वेदप्रणित संशोधन करत आहेत. रोगाच्या मूळाशी जाऊन विचार व उपचार करण्याची त्यांची पद्धत आणि देशविदेशांत सातत्याने आयुर्वेदप्रणित संशोधन शास्त्रशुद्ध पद्धतीने सादर करण्याचा त्यांचा उपक्रम उल्लेखनीय आहे. तसेच परवडणारी औषधे विकसित करण्याचा प्रयत्न महत्त्वाचा आहे."

वैद्य योगेश बेंडाळे म्हणाले, "१९९६ पासून पाश्चात्त्य वैद्यकाच्या तुलनेत आयुर्वेद हे शास्त्र म्हणून कमी पडते आहे की आयुर्वेदतज्ज्ञ कमी पडत आहेत, याचा शोध घेताना, रसायू लाईफ सायन्सेसची संकल्पना रुजली. ३० वर्षांच्या अथक संशोधनातून ४५ पेक्षा जास्त पेटंट्स प्राप्त करण्यापर्यंत प्रवास झाला आहे. नुकतेच जगातले पहिले ओरल ड्रग (तोंडाने घ्यावयाचे औषध) जागतिक आरोग्य व्यासपीठावर सादर केले आहे. नव्या वास्तूमधूनही संशोधनावर भर देत निरामयतेकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न राहील."

डॉ. प्रतीक तोरणे यांनी सूत्रसंचालन केले. वैद्य योगेश बेंडाळे यांनी आभार मानले.

# दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडिया पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी सीएमए राहुल चिंचोळकर

पुणे (दै. संध्या)

दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी सीएमए राहुल चिंचोळकर यांची निवड झाली आहे. मावळते अध्यक्ष सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली यांच्याकडून त्यांनी कार्यभार स्वीकारला. उपाध्यक्षपदी सीएमए हिमांशू दवे, सचिवपदी सीएमए तनुजा मंत्रवादी, तर खजिनदारपदी सीएमए अमेय टिकले यांची निवड झाली आहे.



२०२६-२७ या वर्षाकरिता नव्या कार्यकारिणीची निवड नुकतीच करण्यात आली. व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली, सीएमए निलेश केकाण, सीएमए नागेश भागणे, सीएमए अनुजा दाभाडे आणि सीएमए निखिल अगरवाल यांचा समावेश आहे. यावेळी 'आयसीएमएआय'च्या विभागीय समितीचे सदस्य सीएमए चैतन्य मोहरीर, ज्येष्ठ सदस्य व माजी अध्यक्ष सीएमए डॉ. धनंजय जोशी, सीएमए डॉ. संजय भार्गवे, सीएमए डॉ. एन. के. निमकर, सीएमए अभय देवधर, सीएमए प्रमोद दुबे, सीएमए प्रसाद जोशी, सीएमए मीना वैद्य आणि संस्थेच्या सर्व सदस्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

'आयसीएमएआय' पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून सीएमए राहुल चिंचोळकर म्हणाले, “ संस्थेच्या ज्येष्ठ व माजी पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर विश्वास दाखवून ही जबाबदारी दिल्याबद्दल आभार व्यक्त करतो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली येणाऱ्या काळात आणखीन चांगले काम करण्याचा माझा प्रयत्न राहील. वाणिज्य किंवा इतर क्षेत्रातील विद्यार्थ्यांना करिअरची उत्तम संधी उपलब्ध करून देणारी ही संस्था आहे. गेल्या सात दशकांची उज्ज्वल परंपरा असलेल्या या संस्थेच्या अध्यक्षपदी काम करणे हा आनंदाचा क्षण आहे. राष्ट्रनिर्माणाच्या दृष्टीने माझ्या परीने शक्य तितके योगदान देण्याचा माझा प्रयत्न राहणार आहे. आगामी वर्षात विद्यार्थी व सदस्यांसाठी विविध उपक्रम, मार्गदर्शन सत्रे, कार्यशाळा, एआय व अन्य प्रगत अभ्यासक्रम राबविण्यावर भर दिला जाणार आहे."

सीएमए श्रीकांत इप्पलपल्ली यांनी गेल्या वर्षभरात राबविलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. सीएमए हिमांशू दवे, सीएमए तनुजा मंत्रवादी, सीएमए अमेय टिकले यांनीही निवडीबद्दल आनंद व्यक्त करत मनोगत मांडले. डॉ. संजय भार्गवे यांनी मार्गदर्शन केले.



## मराठी रंगभूमीला नव्या दिशेची गरज; श्रीराम लागू नाट्य महोत्सवात रंगले विचारमंथन

पुणे (दै. संध्या)

मराठी रंगभूमीची मुख्य धारा करमणुकीच्या चौकटीत रमली आहे. मात्र, मानवी जगणे समजून घेण्याच्या प्रक्रियेकडे रंगभूमीची वाटचाल होणे अपेक्षित आहे. स्मृतिरंजनापलीकडे जाऊन, नव्या काळाची आव्हाने पेलणाऱ्या कलात्मक रंगभूमीची दिशा आता अपेक्षित आहे, असा सूर रंगभूमीविषयक परिसंवादात येथे उमटला.

महाराष्ट्र कल्चरल सेंटर आणि लागू कुटुंबीयांच्या वतीने आयोजित पहिल्या श्रीराम लागू राष्ट्रीय नाट्य महोत्सवात ‘मराठी रंगभूमी : काल, आज उद्या’ या विषयावर सत्र आयोजित केले होते. चार सत्रांमध्ये झालेल्या या परिसंवादात स्पर्धा रंगभूमी, अव्यावसायिक, व्यावसायिक आणि उद्याची रंगभूमी असे विषय केंद्रस्थानी धरून चर्चा झाली.

त्यामध्ये इरफान मुजावर, डॉ. अनिल बांदिवडेकर, हेमंत एदलाबादकर, हिमांशू स्मार्त, पराग घोंगे, दिलीप जगताप, शेखर ढवळीकर, क्षितिज पटवर्धन, चं. प्र. देशपांडे, पुरुषोत्तम बेर्डे, इरावती कर्णिक आणि चंद्रशेखर फणसळकर यांनी भाग घेतला.

## ‘तंबाखूला नकार, आरोग्याला स्वीकार’; व्यसनमुक्त समाजासाठी सर्वांनी पुढे यावे – डॉ. कल्याण गंगवाल

पुणे (दै. संध्या)

31 मे रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक तंबाखूमुक्त दिनानिमित्त सर्व जीव मंगल प्रतिष्ठानतर्फे तंबाखूविरोधी जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. यंदाच्या दिनाची संकल्पना तंबाखू आणि निकोटीन उत्पादनांच्या खोट्या आकर्षणामागील सत्य समोर आणून व्यसनाला आळा घालण्याची आहे.

सर्वमंगल प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कल्याण गंगवाल यांनी सांगितले की, आधुनिक विपणन तंत्रांचा वापर करून तंबाखू कंपन्या युवकांना लक्ष्य करत आहेत. आकर्षक जाहिराती, रंगीत पॅकेजिंग आणि विविध फ्लेवर्सच्या माध्यमातून तंबाखूजन्य पदार्थांचे



आकर्षण वाढवले जात आहे. परिणामी अनेक तरुण व्यसनाच्या गर्तेत ओढले जात आहेत.

तंबाखूचे सेवन केवळ व्यक्तीच्या आरोग्यावरच नव्हे तर संपूर्ण कुटुंबावर परिणाम करते. कर्करोग, हृदयविकार, श्वसनाचे विकार आणि स्ट्रोक यांसारख्या गंभीर आजारांमुळे उपचारांचा मोठा आर्थिक बोजा निर्माण होतो. त्यामुळे तंबाखूमुक्त समाज निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

जागतिक तंबाखूमुक्त दिनानिमित्त प्रत्येक नागरिकाने “मी तंबाखूपासून दूर राहीन आणि इतरांनाही तिच्या दुष्परिणामांविषयी जागरूक करीन” हा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले. तसेच शाळा, महाविद्यालये, पालक आणि सामाजिक संस्थांनी एकत्रितपणे युवकांना तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. “व्यसनमुक्ती हीच खरी देशभक्ती आहे. चला, आजच तंबाखूला कायमचा निरोप देऊन निरोगी आणि सुदृढ समाज घडवूया,” असा संदेश देत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## पुणे महापालिकेचे मिळकतकर पोर्टल दोनदा ठप्प; शेवटच्या दिवशी करदात्यांची धावपळ

पुणे (दै. संध्या)

मिळकतकर भरण्यावर मिळणाऱ्या विशेष सवलतीची मुदत संपण्यास अवघा एक दिवस शिल्लक असताना पुणेकरांनी मोठ्या प्रमाणात ऑनलाइन कर भरण्यास पसंती दिली. मात्र, नागरिकांच्या वाढलेल्या प्रतिसादामुळे महापालिकेच्या मिळकतकर संकेतस्थळावरील सर्व्हरवर प्रचंड ताण निर्माण झाला आणि संकेतस्थळ दोन वेळा बंद पडल्याची घटना शनिवारी घडली. त्यामुळे कर भरण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या हजारो नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. दरम्यान, 30 मेपर्यंत 5 लाख 77 हजार 497 मिळकतधारकांनी 1090 कोटी रुपयांचा कर भरणा केला आहे.

महापालिकेकडून चालू आर्थिक वर्षासाठी मुदतीपूर्वी संपूर्ण मिळकतकर भरणाऱ्या नागरिकांना 5 ते 10 टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येत आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी शेवटच्या टप्प्यात ऑनलाइन कर भरण्यावर भर दिला.

परिणामी अनेक नागरिकांना पेमेंट प्रक्रिया पूर्ण करता आली नाही. काहींना व्यवहार अर्धवट राहिल्याने पुन्हा प्रयत्न करावे लागले. यामुळे नागरिकांत संभमाचे वातावरण निर्माण झाले. याबाबत अनेकांनी सोशल मीडियावर आणि महापालिकेकडे तक्रारी नोंदवल्या आहेत. दरम्यान, महापालिकेने संकेतस्थळाच्या तांत्रिक दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे. नागरिकांनी घाबरून न जाता काही वेळाने पुन्हा प्रयत्न करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले. वेबसाईट सुरू नसल्यास नागरिकांना जवळच्या नागरी सुविधा केंद्रांमध्ये जाऊन कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली.

महापालिकेच्या कर आकारणी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सवलत योजनेला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे गेल्या 58 दिवसांत तब्बल 1090 कोटी रुपयांहून अधिक महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.

# व्यवसायात गुणवत्ता आणि विश्वास टिकवला तर यश आपोआप मिळते - केदार चितळे

पुणे (दै. संध्या)

पुणे अगरबत्ती मॅन्युफॅक्चरर आणि डीलर असोसिएशन यांच्या वतीने आयोजित “बिझनेस इन्स्पिरेशन समिट २०२६” हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष  संजय ओझा यांनी केले उद्योगविश्वातील प्रेरणादायी अनुभव, व्यवसायातील बदल, गुणवत्ता आणि ग्राहकांचा विश्वास यावर झालेल्या चर्चेमुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते नामांकित उद्योजक केदार चितळे यांची विशेष मुलाखत राहुल भालेराव यांनी खुसखुशीत शैलीत घेतलेल्या मुलाखतीत केदार चितळे यांनी सांगली जवळील



भिलवडी पासून सुरू झालेला प्रवास आता ३५ वर्षांहून अधिक अनेक देशापर्यंत पोहोचला आहे.

चितळे एक्सप्रेस, मिठाई जलसा, अशा नाविन्यपूर्ण गोष्टी बरोबर ब्रँड अँबेसिडर सर्वांचे लाडके क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर यांच्यामुळे उत्पादनाचा आणि बाकरवडीचा झालेला ग्लोबल विस्तार असा प्रेरणादायी प्रवास उलगडला. गुणवत्ता, ग्राहकांचा विश्वास, सातत्य आणि आधुनिक तंत्रज्ञान यामुळे उद्योगविश्व मोठ्या उंचीवर पोहोचू शकते, असे त्यांनी नमूद केले.


अगरबत्ती उद्योगाचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनातील महत्त्व यावेळी विशेष अधोरेखित करण्यात आले. देवपूजा, आरती, सण-उत्सव आणि धार्मिक कार्यक्रमांमध्ये अगरबत्तीला विशेष स्थान असून, या उद्योगामुळे हजारो कुटुंबांना रोजगार उपलब्ध होत असल्याचे मान्यवरांनी सांगितले. महिलांना घरबसल्या रोजगार, लघुउद्योगांना चालना आणि स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात अगरबत्ती उद्योगाचा मोठा वाटा असल्याचेही नमूद करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय ओझा, उपाध्यक्ष मदन मगणानी, रविंद्र संचेती, सचिव पवन ओसवाल, सोहन सेठ ओसवाल यांच्यासह अनेक उद्योजक आणि व्यावसायिक उपस्थित होते. यावेळी केदार चितळे यांचा पुणेरी पगडी, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

उद्योगविश्व, संस्कार आणि व्यवसायातील प्रामाणिकपणाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाल्याने “बिझनेस इन्स्पिरेशन समिट २०२६” हा कार्यक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला. आभार उपाध्यक्ष रविंद्र संचेती यांनी मानले.

“व्यवसायात प्रामाणिकपणा, गुणवत्ता आणि ग्राहकांचा विश्वास टिकवला तर यश आपोआप मिळते,” असे केदार चितळे यांनी यावेळी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिवादन

अहिल्यानगर (दैनिक संध्या) : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 301 व्या जयंतीनिमित्त चौंडी (ता.जामखेड) येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास भेट देऊन अभिवादन केले. यावेळी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीही अभिवादन केले. याप्रसंगी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे आदी उपस्थित होते. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांचे स्मारक येथे जाऊन दर्शन घेतले.

### नायगाव येथे पौर्णिमा उत्साहात साजरी

पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदरच्या तालुक्याच्या पुर्व भागातील श्री क्षेत्र नायगाव येथे अधिक जेष्ठ पौर्णिमेनिमित्त हजारो भाविकांनी श्री सिद्धेश्वर



महाराज व माता जोगेश्वरी यांचा दर्शनाचा लाभ घेतला. पौर्णिमेनिमित्त पहाटे पांडेश्वर येथून ग्रामस्थांनी आणलेल्या कऱ्हेच्या पाण्याने श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांना स्नान घालण्यात आले व अभिषेक करण्यात आला.त्यानंतर अशोक नामदेव खेसे यांच्या सौजन्याने ह.भ.प. ऋषिकेश महाराज चोरगे (वाणीभूषण) यांच्या सुश्राव्य किर्तनाचा भाविकांनी लाभ घेतला.त्यांनी विविध उदाहरणे देऊन भाविकांना मंत्रमुग्ध केले.गायन साथ कोलते ,मोरे,चांगण महाराज यांनी दिली. मृदुंग साथ तेजस महाराज खेसे यांनी दिली.भजन साथ नायगाव भजनी मंडळाने दिली.श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची आकर्षक महापुजा पुजारी अरुण जगताप यांनी केली.त्यानंतर आरती होऊन महाप्रसाद झाला. अन्नदान अशोक नामदेव खेसे (नायगाव) यांनी केले. सुप्रिया चौंडकर, लक्ष्मण गोरावडे, राजेंद्र कड, बबन चौंडकर (नायगाव), सुनिता कुंजीर (वाघापूर), सावता होले (कर्जत), प्रिया कुतवळ (कुतवळवाडी), दत्तात्रय बोत्रे (यवत), भानुदास कोतवाल (अष्टापूर), लता मगर (पानवडी), विठ्ठल खटाटे यांचे अन्नदान देणगीच्या स्वरूपात सहकार्य लाभले. मंदिर परिसराची स्वच्छता, लाईट, पाणी, दर्शनबारी आदिंची उत्तम व्यवस्था केली होती असे ट्रस्टचे राहुल कड यांनी सांगितले.

### नियुक्तीवरून सुरू असलेल्या वादावर काँग्रेस जिल्हाध्यक्षा श्रुती म्हात्रे यांचे स्पष्टीकरण

उरण (दैनिक संध्या) : पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्तीनंतर सुरू झालेल्या वाद आणि कार्यकर्त्यांच्या नाराजीवर नवनियुक्त जिल्हाध्यक्षा श्रुती म्हात्रे यांनी पत्रकार आणि वृत्तवाहिन्याशी बोलताना प्रथमच सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. आपली नियुक्ती ही कोणत्याही शिफारस किंवा वशिल्यामुळे नसून पक्षातील अनुभव, कार्यकर्तृत्व आणि कार्यकर्त्यांच्या जनभावनेच्या आधारे झाल्याचा दावा त्यांनी केला. श्रुती म्हात्रे यांनी सांगितले की, पनवेल तसेच उत्तर आणि दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष पदासाठी त्यांचे नाव चर्चेत होते. काँग्रेस पक्षाकडून तिन्ही ठिकाणांसाठी जिल्हाध्यक्ष पदाकरिता अर्ज प्रक्रिया जाहीरपणे राबविण्यात आली होती. काँग्रेसच्या राष्ट्रीय प्रवक्त्या डॉ. रागिणी नायक यांनी रायगड आणि पनवेल परिसरात निरीक्षण दौरे आणि इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्या प्रक्रियेनंतरच पक्षाने आपल्यावर जबाबदारी सोपविल्याचे त्यांनी स्पष्ट केले. “माझ्या नियुक्तीमागे कोणत्याही नेत्याची शिफारस किंवा वशिला नाही. पक्ष संघटनेतील कामाचा अनुभव, सातत्याने केलेले कार्य आणि कार्यकर्त्यांच्या भावनेतून मला ही जबाबदारी मिळाली आहे,” असे श्रुती म्हात्रे यांनी म्हटले आहे. पनवेल काँग्रेसमधील नाराज गटाने मुंबईतील ‘टिळक भवन’ येथे जाऊन निवडीविरोधात आक्षेप नोंदविल्याबाबत बोलताना त्यांनी संयमी भूमिका घेतली. “प्रत्येकाची महत्वाकांक्षा वेगळी असते. त्यामुळे काही कार्यकर्ते टिळक भवन येथे गेले असतील. मात्र, ते माझेच बंधू आहेत. त्यांच्या निर्णयाचे मी स्वागत करते. न्याय जाणून घेण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे,” असे त्या म्हणाल्या. सध्याच्या वादावर भाष्य करताना त्यांनी, “रीचेकिंगनंतरच निकाल अधिक चांगला समजतो. त्यामुळे येत्या काही दिवसांत जर काही बदल किंवा निर्णय झाले, तर त्यातून वस्तुस्थिती स्पष्ट होईल,” असे सूचक वक्तव्य केले. तसेच निषेधाच्या माध्यमातून काही लोकांची दिशाभूल करण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला. “२० मे रोजीच आम्हाला पदांची अधिकृत घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी मला भेटून गेले होते,” असा दावा त्यांनी केला. श्रुती म्हात्रे यांनी पुढे सांगितले की, पक्षाच्या आदेशानुसार अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन आयोजित करण्यात आले. त्यामुळे पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी थेट कार्यकर्त्यांसोबत आंदोलनात सहभाग घेतला. “पक्षाने दिलेल्या आदेशानुसार आम्ही एकत्रितपणे आंदोलन केले. संघटन मजबूत करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा आमचा प्रयत्न राहील,” असेही त्यांनी स्पष्ट केले.



# खंडोबाला हरिद्रागंध उटी आंबा फळ फुलाची आरास

**मंचर (दै. संध्या) :**

धामणी (तालुका आंबेगांव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात स्वयंभू सप्तशिवलिंगाचा व खंडोबा, म्हाळसाई व बाणाईच्या सर्वांगसुंदर मुखवट्यांचा वासंतिक हरिद्रागंधउटी (हळद) व आंबा फळ फूल सोहळा उत्साहात रविवारी (३१ मे) साजरा झाला.

अधिक जेष्ठ पौर्णिमेनिमित्त पारंपारिक हरिद्रागंधउटी सोहळ्यासाठी झेंडू, अष्टर, गुलाब,मोगरा आणि शुध्द हळदीचा वापर करण्यात आला. वाढत्या उन्हापासून देवाला थंडावा मिळावा, या भावनेतून स्वयंभू सप्तशिवलिंगाला व मुखवट्यांना हरिद्रागंधाचा (हळदीचा) लेप लावून गाभाऱ्यात सुगंधी फुलांची व आंब्याच्या फळांची आरास करण्यात आली होती. यामुळे मंदिर परिसर भक्तिने आणि सुगंधाने न्हाऊन निघाले होते. अधिक महिण्यातील पौर्णिमेच्या मुहर्तावर रविवारी शेकडो भाविकांनी "सदानंदाचा येळकोट, जय मल्हारच्या नामघोषात धामणी (तालुका आंबेगांव) येथील पुरातन श्री म्हाळसाकांत खंडोबाचे दर्शन घेतले.

अधिक जेष्ठ पौर्णिमेच्या निमित्ताने खंडेरायाच्या स्वयंभू सप्तशिवलिंगावर सरत्या चैत्र व वैशाख व जेष्ठ महिण्यातील वसंत व ग्रीष्म ऋतुतील पाचवी व अंतीम वासंतिक हरिद्रागंधउटी साकारण्यात आली.खंडोबा. म्हाळसाई व बाणाईच्या व स्वयंभू सप्तशिवलिंगावर साकारलेल्या हरिद्रागंधटीचे मनमोहक रुप पाहाण्यासाठी तसेच दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

तत्पूर्वी धामणीच्या पुरातन खंडोबा मंदिरात पहाटे चार वाजता घंटानाद झाला.त्यानंतर



चंद्रकांत शेवाळे व लता शेवाळे (मंचर), विजय फुलसुंदर व कुंदा फुलसुंदर (अवसरी बुद्रुक), दिलखूष जाधव व वंदना जाधव (शिक्रापूर) ज्ञानेश्वर भुमकर व मिरा भुमकर (मुंबई), दत्ता विधाटे व माधुरी विधाटे (चाकण), राजेंद्र बढेकर व शारदा बढेकर (लोणी). कैलास जाधव व रुपाली जाधव (धामणी) राजेंद्र घोलप व मंगल घोलप (देवमळा) दिलीप सोनवणे व संगिता सोनवणे (धामणी) या ९ जोडप्यांच्या हस्ते वसंत पूजा व दुग्धाभिषेक व रुद्राभिषेक संपन्न झाला.खंडेराय म्हाळसाई बाणाई व जोगेश्वरीच्या देखण्या मूर्तींना वस्त्रालंकार व सुंगधी फुलांचे हार घालण्यात आल्यानंतर देवस्थानाचे सेवेकरी दादाभाऊ भगत,प्रभाकर भगत, सुभाष तांबे, शांताराम भगत, नामदेव भगत, राजेश भगत, राहूल भगत, अनिरुध्द वाळूंज, यांच्याकडून स्वयंभू सप्तशिवलिंग आणि पंचधातूच्या सर्वांगसुंदर देखण्या खंडोबा म्हाळसाई व बाणाईच्या मुखवट्यावर सुवासिक केशर व सुंगधी दवण्याचे अत्तरमिश्रित हरिद्रागंध हळदीचा लेप देण्यात आला.

त्यानंतर खंडेरायाला अनारस्याचा नैवेद्य दाखवण्यात येऊन शेकडो भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली. सुवासिक हरिद्रागंधाचे लेपन करत असताना मंदिराच्या आवारात पारंपारिक वाद्याचा गजर सुरु होता. पौर्णिमेच्या अभिषेकाचे पौरोहित्य प्रमोद देखणे यांनी केले. वसंत ऋतुच्या उष्म्याची दाहकता कमी करण्यासाठी मंदिराच्या गाभाऱ्यात व सभामंडपात झेंडू,गुलाब, अष्टरच्या फुलांची सजावट मुंबई व चाकण येथील भाविक ज्ञानेश्वर भुमकर व दत्ता विधाटे यांच्या सौजन्याने केलेली होती.

मंदिराचे आवारात व सभोवताली भल्या पहाटे महिला भाविकांनी आकर्षक रांगोळ्या काढलेल्या होत्या.पहाटे मंदिरात स्वयंभू सप्तशिवलिंगाला हरिद्रागंधाच्या उटीचे लेपन केल्यानंतर उपस्थित भाविकांच्या कपाळाला भंडारा लावण्यात आला.वासंतिक हरिद्रागंधउटी सोहळ्यानंतर भाविकांना दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले अधिक महिण्यातील पौर्णिमेच्या निमित्ताने खंडोबाचे दर्शनासाठी पुणे.नगर.पिंपरी चिंचवड जिल्ह्यातील भाविक व नवविवाहीत जोडपी कुटुंबियासह आलेले दिसत होते.

## पुण्यातील दारूकांडाचे भिवंडी कनेक्शन उघड; भिवंडीतील रेक्स कंपनीतून मिथेनॉलचा साठा जप्त

**मुंबई (दै. संध्या) :**

भिवंडी परिसरातील रेक्स इंटरनॅशनल कंपनीवर धाड टाकून ‘मिथेनॉल’ या विषारी रसायनाचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. पुण्याच्या विक्रेत्याने याच कंपनीकडून घेतलेले ‘मिथेनॉल’ दारूत मिसळले होते. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दारूत मिथेनॉल हे विषारी रसायन मिसळल्यामुळे अनेकांना जीव गमवावा लागल्याने अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी ‘मिथेनॉल’चा अवैध साठा करणाऱ्यांवर कारवाईचे आदेश दिल्यावर ही कारवाई करण्यात आली.

छाप्यादरम्यान कंपनीत ५९२९ किलोग्रॅम साठा आढळून आला. धक्कादायक बाब म्हणजे या विषारी द्रव्याची कोणतीही नोंद उपलब्ध नव्हती. तसेच, साठा नोंदवहीही आढळली नाही. अन्न व औषध प्रशासनातर्फे विषारी द्रव्य अधिनियमान्वये ‘कारणे



दाखवा’ नोटीस बजावण्यात आली असून परवाना रद्द करण्याची कारवाई सुरू झाली आहे.

संस्थेकडे या द्रव्यांचा कोणताही खरेदी-विक्रीचा तपशील उपलब्ध नव्हता. त्यामुळे विषारी द्रव्याचा साठा जप्त करण्यात आला. कंपनीचे मालक अरुणकुमार चौबे व अभिषेक चौबे यांच्या विरोधात नारपोली पोलिस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

राज्यातील प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याच्या विक्रीविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी मोहीम हाती घेतली असून, २९ मे रोजी राज्यभर राबविण्यात आलेल्या धडक कारवाईत ३३ जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच २८ आस्थापना सील करून ६ लाख १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. राज्यभर सुरू असलेल्या मोहिमेचा भाग म्हणून बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर विभागांत एकाच दिवशी व्यापक कारवाई करण्यात आली.

नागरिकांनी अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत किंवा भेसळीबाबत शंका आल्यास त्वरित अन्न व औषध प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन मुंढे यांनी केले आहे. तक्रार करताना स्वतःचे नाव, संपर्क क्रमांक, संबंधित आस्थापनेचा अचूक पत्ता आणि भेसळीची माहिती द्यावी. जनतेच्या आरोग्याशी खेळ कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही. प्रतिबंधित पदार्थांची विक्री अथवा उत्पादन करणाऱ्यांविरोधात आणखी कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

## दोन नंबर धंद्यातून पोलिसांना मिळते अडीच कोटींचे कमिशन

**ओरोस (दै. संध्या) :**

मटका, जुगार, दारू, तस्करी यासारख्या दोन नंबर धंदेवाल्यांकडून पोलिसांचे कलेक्शन सुरू आहे. यातून पोलिसांना दरमहा कमीतकमी सव्वादोन ते अडीच कोटी रुपयांचे कमिशन मिळते. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे दोन अधिकारी जिल्ह्यात हप्ते जमा करण्याचे काम करतात. गोव्यातून दारू वाहतूक करणाऱ्या एकाच नंबरच्या तीन गाड्या फिरत आहेत, त्यांच्यावर कारवाई का होत नाही?. पोलिस अधिक्षकांच्या या निष्क्रीय कारभारामूळे आमचे सरकार बदनाम होत आहे.

ते जोपर्यंत येथून जात नाहीत तोपर्यंत आपण गप्प बसणार नाही असा इशारा आ. नीलेश राणे यांनी पत्रकार परिषदेत दिला. आ. राणे म्हणाले, आपण स्वतः या सरकारचा भाग आहे, त्यामूळे जिल्ह्याच्या हितासाठी मला बोलावे लागत आहे.

पोलिस अधीक्षक मोहन दहिकर हे कधीही रस्त्यावर उतरून कारवाई करताना दिसले नाहीत. ते आल्यापासून फक्त बदली मागून पळ काढण्याचा प्रयत्न करत आहेत. ज्याला काम करायची इच्छा नसेल त्याला तात्काळ हाकलून दिले पाहिजे.

पोलिस अधिक्षकांच्या कारभाराच्या तक्रारींचा पाढा वाचत या प्रकरणी आपण जिल्ह्याचे पालकमंत्री, खासदार, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार असल्याचे आ. नीलेश राणे यांनी सांगितले. ते म्हणाले, दोडामार्गमध्ये रबर शेतीच्या नावाखाली तब्बल १८०० हेक्टर जमिनीवर गांजा लागवड केली आहे. तिथे दहशतीमुळे स्थानिक लोक जाऊ शकत नाहीत, मग पोलिस तिथे कारवाई का करत नाहीत? जिल्ह्यात बिफ (गोमांस) कुठे मिळते हे जगजाहीर असूनही पोलिस कारवाई करत नाहीत आणि गो-तस्करीवर मोका लावला जात नाही, असा आरोपही आ. राणे यांनी केला.

## माहिती फलक न लावल्यास होणार कारवाई

**नाशिक (दै. संध्या) :**

कांद्यासाठी १,५८० रुपये क्विंटलचा दर निश्चित झाल्यानंतरही कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये खरेदी केंद्रांबाबत शेतकऱ्यांना योग्य माहिती दिली जात नसल्याची बाब समोर येत असून, त्यासाठी आता जिल्हाधिकाऱ्यांनीच पुढाकार घेतला आहे. प्रत्येक नाफेडच्या खरेदी केंद्रासह बाजार समितीने कांदा खरेदी केंद्राची योग्य माहिती देणारा फलक, त्यावरच कांद्याचा दर आणि खरेदी केंद्राकडे जाणारे फलक दर्शनी भागात लावावेत, असे स्पष्ट आदेश जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिले आहेत.

नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाईचा इशाराही त्यांनी दिला आहे. कांद्याच्या मागील महिन्यात गडगडलेल्या भावामुळे बळीराजाला मोठा फटका बसला. कांद्याला मिळणाऱ्या कवडीमोल भावामुळे संपूर्ण राज्यात ठिकठिकाणी आंदोलनेही झाली. त्याचे सर्वाधिक पडसाद नाशिक, लासलगाव, निफाडमध्ये उमटले.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी जिल्ह्यात येऊन आंदोलनही केले. त्यानंतर शासनाने दखल घेत, कांद्याला १,५८० रुपयांचा दर निश्चित करीत नाफेडद्वारे त्याची खरेदीही सुरू केली. अशातच जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनीही त्यातील बारीकसारीक बाबी शोधून मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यावर अंमलबजावणी प्रक्रिया सुरू झाली. त्यात प्राधान्याने नाफेडचे केंद्र तसेच बाजार समितीत कांदा खरेदी केंद्र कुठे आहे, याची माहितीच शेतकऱ्यांना दिली जात नसल्याची गंभीर बाब समोर आल्यानंतर आता जिल्हाधिकारी प्रसाद यांनी प्रत्येक खरेदी केंद्राकडे जाणारा मार्ग दर्शविण्याचे, स्पष्ट फलक अन् त्यावर कांद्याच्या दरांची माहिती देण्याचे आदेश दिले आहेत.

**तीन विभागांद्वारे शेतकऱ्यांसाठी मदत**

पथके कांद्याच्या लागवडीपासून, साठवणूक व माहिती, विक्रीतील घोळ, घोटाळा अन् फसवणूक यावर नियंत्रणासाठी आता कृषी, पणन आणि महसूल विभागाचे एकत्रित पथक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी तालुका स्तरावर कार्यरत आहे. त्यानुसार शेतकऱ्यांनी आपली कुठलीही अडचण, समस्या या पथकांकडे मांडावी. त्यावर त्यांना योग्य तो सल्ला अन् मार्गदर्शन केले जाणार असल्याचे जिल्हाधिकारी प्रसाद यांनी सांगितले.

## पोर्ला परिसरात हत्तींचा धुमाकूळ; साहित्यासह फळबागांची केली नासधूस

**गडचिरोली (दै. संध्या) :**

तालुक्यातील पोर्ला परिसरातील गावांमध्ये रानटी हत्तींचा वावर असून, या हत्तींनी आज पहाटे नगरी येथील मनोहर कुंभारे यांच्या शेतातील विविध साहित्य आणि फळबागांची नासधूस केली.

चालू आठवड्यापासून पोर्ला परिसरातील गावांमध्ये रानटी हत्ती फिरत आहेत. ३३ च्या संख्येत असलेल्या हे हत्ती पाच-सहा दिवसांपूर्वी साखरा येथील नदीतून मार्गक्रमण करताना दिसले होते. दोन दिवसांपूर्वी त्यांनी नवरगाव येथील पिकाचे नुकसान केले. काल रात्री हे हत्ती मोहझरीचा रस्ता ओलांडून नगरी येथे गेले. तेथे हत्तींनी मनोहर कुंभारे यांच्या शेताभोवताल लावलेले तारेचे कुंपण



आणि सिमेंट काँक्रिटचे खांब उखडून फेकले. बांबूची झाडेही मुळासकट उपटून टाकली. शिवाय आंब्याच्या झाडांचीही नासधूस केली.

शेतकरी वन्यप्राण्यांना स्वत:हून कोणतीही इजा पोहचवत नाही. परंतु हे प्राणी शेतातील साहित्य व पिकाचे नुकसान करीत असतील तर ते शेतकऱ्यांना परवडणारे नाही. वन्यप्राण्यांकडून जीवित हानी झाल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. त्या टाळण्यासाठी वनविभागाने वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रभावी उपाययोजना केल्या पाहिजे, असे मनोहर कुंभारे म्हणाले.

## श्रीलंका दौऱ्यापूर्वी टीम इंडियाला झटका; दुखापतग्रस्त रियान पराग बाहेर

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

श्रीलंका येथे ९ जूनपासून सुरू होणाऱ्या 'इंडिया-ए' संघाच्या वनडे ट्राय-सीरीजसाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) संघात महत्त्वपूर्ण बदल जाहीर केला आहे. हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे युवा फलंदाज रियान पराग या मालिकेतून बाहेर पडला असून, त्याच्या जागी अनुभवी ऋतुराज गायकवाडची संघात निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, बीसीसीआयने ऋतुराज गायकवाडकडे या मालिकेसाठी उपकर्णधारपदाची जबाबदारीही सोपवली आहे.

या ट्राय-सीरीजसाठी सुरुवातीला जाहीर करण्यात आलेल्या संघात तिलक वर्माकडे नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली होती, तर रियान पराग उपकर्णधार होता. मात्र, परागला झालेल्या दुखापतीमुळे आता संघात पुनर्रचना करण्यात आली आहे. बीसीसीआयने दिलेल्या अधिकृत माहितीनुसार, रियान पराग आता पुढील काही काळ बंगळुरू येथील 'सेंटर ऑफ एक्सलन्स'मध्ये राहून आपल्या दुखापतीवर उपचार (रिहॅबिलिटेशन) करून घेणार आहे. आयपीएल २०२६ च्या हंगामात राजस्थान रॉयल्सचे नेतृत्व करताना परागला हॅमस्ट्रिंगच्या समस्येने त्रस्त केले होते. या दुखापतीमुळेच आयपीएलमधील काही महत्त्वाच्या सामन्यांत त्याला मुकावे लागले होते आणि त्याच्या अनुपस्थितीत यशस्वी जयस्वालने संघाची धुरा सांभाळली होती.



श्रीलंकेत होणाऱ्या या वनडे ट्राय-सीरीजमध्ये भारत, श्रीलंका आणि अफगाणिस्तान हे तीन 'ए' संघ आमने-सामने येणार आहेत. मालिकेचा पहिला सामना ९ जून रोजी होणार असून, २१ जून रोजी अंतिम सामना खेळवला जाईल. मालिकेतील सर्व सामने दांबुला स्टेडियमवर भारतीय प्रमाणवेळेनुसार सकाळी १० वाजल्यापासून खेळवले जातील. या स्पर्धेत प्रत्येक संघ एकमेकांविरुद्ध दोन सामने खेळणार आहे.

मालिकेसाठी भारताचा सुधारित संघ: तिलक वर्मा (कर्णधार), ऋतुराज गायकवाड (उपकर्णधार), प्रियांश आर्या, वैभव सूर्यवंशी, आयुष बडोनी, निशांत सिंधू, सूर्यांश शेडगे, प्रभसिमरन सिंग (यष्टीरक्षक), कुमार कुशाग्र (यष्टीरक्षक), विपराज निगम, यश ठाकूर, युद्धवीर सिंग, अंशुल कंबोज, अरशद खान आणि अनुकूल रॉय.

या मालिकेत सर्वांचे लक्ष १५ वर्षीय सलामीवीर वैभव सूर्यवंशी याच्या कामगिरीवर केंद्रित असणार आहे. आयपीएल २०२६ च्या हंगामात आपल्या आक्रमक फलंदाजीने प्रभावित करणाऱ्या वैभवसाठी ही मालिका त्याच्या कारकिर्दीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. भारताच्या युवा ताफ्याला या मालिकेत आपली छाप पाडण्याची मोठी संधी आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पावसाळ्यापूर्वी पिंपळे गुरव परिसरातील नाले, ड्रेनेजची सफाई करा : शाम जगताप

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपळे गुरव परिसरातील पावसाळी वाहिन्या, ड्रेनेज लाईन आणि चेंबरची दुरावस्था लक्षात घेता पावसाळा सुरू होण्यापूर्वी आवश्यक सफाई आणि दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी नगरसेवक श्याम जगताप यांनी केली आहे. पावसाळ्यापूर्वी सुरू असलेल्या कामांची पाहणी केल्यानंतर त्यांनी जलनि:स्सारण विभागाचे सहशहर अभियंता विनय ओहोळ आणि स्थापत्य विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांना निवेदन सादर केले. यामध्ये पावसाळी वाहिन्या, नाले आणि ड्रेनेज यंत्रणेची तातडीने सफाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. नगरसेवक शाम जगताप यांनी निवेदनात नमूद केले आहे की, पिंपळे गुरवमधील अनेक ठिकाणी पावसाळी चेंबर आणि ड्रेनेज लाईनमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ, कचरा आणि साचलेले पाणी जमा झाले आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच पावसाळ्यात पाणी तुंबून नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागू शकतो. पावसाळ्यात संभाव्य पूरस्थिती व आरोग्यविषयक समस्या टाळण्यासाठी संबंधित विभागाने तात्काळ कारवाई करून चेंबरमधील गाळ आणि कचरा काढावा तसेच संपूर्ण जलनि:स्सारण व्यवस्था सुरळीत करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.



### दारुच्या हातभट्ट्या पुन्हा सुरु होतात; बंदोबस्ताची गरज – रामदास आठवले

पिंपरी (दैनिक संध्या) : फुगेवाडी येथे विषारी दारू प्रकरणात मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांची केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी बोलताना त्यांनी अवैध दारू व्यवसायाविरोधात कठोर कारवाईची आवश्यकता व्यक्त केली. रामदास आठवले म्हणाले की, प्रशासनाकडून दारूच्या हातभट्ट्या उद्ध्वस्त केल्या जातात, मात्र काही काळानंतर त्या पुन्हा सुरू होत असल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे अशा अवैध व्यवसायांचे कायमस्वरूपी उच्चाटन करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करण्याची गरज आहे. विषारी दारूमुळे मृत्यू झालेल्या कुटुंबांबद्दल शोक व्यक्त करताना त्यांनी मृतांच्या नातेवाईकांना तातडीने कंत्राट पध्दतीने रोजगार उपलब्ध करून द्यावा, त्यानंतर नियमित प्रक्रियेनुसार पुढील निर्णय घ्यावेत, अशी मागणी राज्य सरकारकडे केली. देशातील विविध भागांमध्ये केमिकलयुक्त व विषारी दारूची विक्री होत असल्याने अनेक निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. अशा दुर्घटना पुन्हा घडू नयेत यासाठी अवैध हातभट्ट्यांवर कायमस्वरूपी बंदोबस्त करणे ही काळाची गरज असल्याचेही आठवले यांनी नमूद केले. विषारी दारू प्रकरणातील पीडित कुटुंबांना न्याय मिळावा आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

### पुणे जिल्ह्यात 2,322 संस्था तंबाखूमुक्त; राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाला मोठे यश

पिंपरी (दैनिक संध्या) : राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, जिल्हा रूग्णालय पुणेतर्फे शैक्षणिक संस्थांना तंबाखूमुक्त करण्यासाठीही व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. मार्च 2026 अखेर पुणे जिल्ह्यातील 2,322 संस्था तंबाखूमुक्त घोषित करण्यात आल्या आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये तंबाखूविरोधी संस्कार रुजविण्यास मदत होत आहे. आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षामार्फत नागरिक, शिक्षक, विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी, पोलीस, वकील, पोलीस पाटील आणि स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींसाठी एकूण 87 प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणांचा लाभ तब्बल 14,687 व्यक्तींनी घेतला.

# सिने सृष्टीच्या विकासासाठी समर्थ पॅनलला पाठिंबा

**भाऊसाहेब भोईर**

पिंपरी (दै. संध्या)



कलाकारांचा सन्मान आणि सिने सृष्टीच्या विकासासाठी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत समर्थ पॅनलच्या सर्व अधिकृत उमेदवारांना बहुमताने निवडून द्यावे असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी केले.

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी ७ जून रोजी मतदान होणार आहे. या निमित्त शनिवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत भाऊसाहेब भोईर बोलत होते. यावेळी समर्थ पॅनलचे निर्माता पदाचे अधिकृत उमेदवार मेघराज राजे भोसले, सुनील महाजन, दिग्दर्शक पदाचे उमेदवार अजित शिरोळे, लेखक पदाचे उमेदवार राज काझी तसेच गौरी लोंढे, संजय ठुबे आदी उपस्थित होते.

यावेळी नवोदित कलाकारांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि सर्व घटकांना एकत्रितपणे पुढे नेण्यासाठी समर्थ पॅनल कार्यरत राहील. मराठी चित्रपटसृष्टीच्या विकासासाठी समर्थ पॅनलला सर्व सभासद भरघोस मतदान करतील असा विश्वास भाऊसाहेब भोईर यांनी यावेळी व्यक्त केला.

मेघराज राजे भोसले यांनी सांगितले की, मराठी चित्रपट आणि कलाकारांच्या विकासासाठी समर्थ पॅनल आता सक्षम आहे. मराठी चित्रपट सृष्टीचा विकास हे ध्येय समोर ठेवून भाऊसाहेब भोईर यांनी स्वतःचा उमेदवारी अर्ज मागे घेऊन निर्माता गटाच्या दुसऱ्या पदासाठीचे उमेदवार सुनील महाजन यांना जाहीर पाठिंबा दिला, असे मोठ्या मनाचे आणि उत्तुंग व्यक्तिमत्व असणारे भाऊसाहेब भोईर यांचा पाठिंब्यामुळे समर्थ पॅनल आता आणखी समर्थ झाले आहे. मराठी चित्रपट सृष्टीच्या सर्व घटकांचे प्रतिनिधित्व करणारे अनुभवी, अभ्यासू आणि कार्यक्षम उमेदवार समर्थ पॅनल तर्फे निवडणूकीत उभे राहिले आहेत.

मराठी चित्रपट सृष्टीतील कलाकार, तंत्रज्ञ, निर्माते, दिग्दर्शक, लेखक, कामगार आणि विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींना न्याय देणारे प्रभावी नेतृत्व मिळावे, या उद्देशाने “कलाकारांचा सन्मान – मराठी सिनेसृष्टीचा विकास” हे ब्रीदवाक्य घेऊन आम्ही निवडणूक लढवत आहे.

या सर्व उमेदवारांना पतंग या चिन्हावर बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन पॅनल प्रमुख ज्येष्ठ निर्माता गटाचे उमेदवार मेघराज राजे भोसले यांनी केले.

समर्थ पॅनल मधील इतर अधिकृत उमेदवार निर्माता गटाच्या दुसऱ्या पदासाठी सुनील महाजन, दिग्दर्शक पदासाठी दीपक कदम (मुंबई), अभिनेता पदासाठी सुशांत शेलार (मुंबई), छायाचित्रण पदासाठी धनाजी यमकर (कोल्हापूर), नृत्य पदासाठी सुभाष नकाशे (मुंबई), ध्वनी पदासाठी शरद चव्हाण (कोल्हापूर), कलादिग्दर्शक प्रवीण (वासू) पाटील (सातारा), वेशभूषा पदासाठी चैत्राली डोंगरे (मुंबई), निर्मिती व्यवस्था पदासाठी रवी गावडे (कोल्हापूर), प्रसिद्धी पदासाठी गणेश गारगोटे (मुंबई), कामगार पदासाठी विकास तोरणे (कोल्हापूर) यांचा समावेश आहे.

समर्थ पॅनलने मराठी चित्रपट सृष्टी समोरील विविध प्रश्न सोडविणे, कलाकार व तंत्रज्ञांच्या हक्कांचे संरक्षण करणे, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे, डिजिटल माध्यमांशी सुसंगत धोरणे राबविणे, तसेच महामंडळ अधिक सक्षम आणि पारदर्शक बनविणे यासाठी कटिबद्ध असल्याचे सुनील महाजन यांनी सांगितले.

## फुगेवाडी विषारी दारू प्रकरणाचा तपास सीआयडीकडे

पिंपरी (दै. संध्या)

फुगेवाडी परिसरातील विषारी दारू प्रकरणाच्या तपासाची सूत्रे आता सीआयडीने हाती घेतली आहेत. या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी सीआयडीचे विशेष पथक शनिवारी दापोडी पोलीस ठाण्यात दाखल झाले होते. सकाळी १० वाजल्यापासून सीआयडीचे अधिकारी तब्बल साडेसात तास पोलीस ठाण्यात तळ ठोकून होते. यावेळी त्यांनी प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे, पुरावे आणि तपासाची माहिती ताब्यात घेतली. तसेच काही आरोपींनाही सोबत घेऊन सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पथक पुण्यातील सीआयडी कार्यालयाकडे रवाना झाले. फुगेवाडी परिसरात विषारी दारूचे सेवन केल्यामुळे आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला असून या घटनेमुळे संपूर्ण शहर हादरले आहे. या प्रकरणी मुख्य आरोपी योगेश वानखेडेसह कर्नलसिंग विरखा, गुरमीतसिंग विरखा आणि राधेश्याम प्रजापती यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने सर्व आरोपींना ८ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. या प्रकरणात दापोडी पोलीस ठाण्याच्या निरीक्षकासह सहा जणांना निलंबित करण्यात आले आहे. तपास सीआयडीकडे वर्ग झाल्याने संपूर्ण प्रकरणाचे धागेदोरे उलगडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## जनगणना प्रक्रियेस नागरिकांचे सहकार्य आवश्यक : आयुक्त सूर्यवंशी

*शिक्षण, आरोग्य व नागरी सुविधांच्या नियोजनासाठी जनगणना माहिती महत्त्वाची*

पिंपरी (दै. संध्या)



‘जनगणना २०२७’ अंतर्गत सुरू असलेली ‘घरसूचीकरण व घरगणना’ प्रक्रिया वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण होण्यासाठी नागरिकांनी प्रगणकांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

महापालिका क्षेत्रात १६ मेपासून प्रगणकांमार्फत घरसूचीकरण आणि घरगणना प्रक्रिया सुरू असून, स्व-गणना माध्यमातून नागरिकांनी भरलेल्या माहितीची पडताळणी आणि अंतिम नोंदणी सध्या केली जात आहे. १ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्व-गणना पूर्ण केलेल्या नागरिकांनी त्यांना प्राप्त झालेला स्व-गणना ओळख क्रमांक (SE ID) प्रगणकांना उपलब्ध करून द्यावा, असे डॉ. सूर्यवंशी म्हणाले.

स्व-गणना ओळखक्रमांक उपलब्ध झाल्यानंतरच संबंधित घराची जनगणना प्रक्रिया अंतिम स्वरूपात पूर्ण होऊ शकते. ज्या नागरिकांनी अद्याप स्व-गणना केलेली नाही, त्यांची माहिती प्रगणकांकडून प्रत्यक्ष भेटीद्वारे नोंदविण्यात येत असून ही प्रक्रिया १४ जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे.

जनगणना कायदा, १९४८ अंतर्गत राबविण्यात येणारी जनगणना ही राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची प्रक्रिया असून, विकास नियोजनासाठी अचूक आणि विश्वासार्ह माहिती संकलनाचा हा आधार मानला जातो. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि नागरी सेवांच्या प्रभावी नियोजनासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले.

जनगणना ही शहराच्या विकास नियोजनाचा महत्त्वाचा आधार असून नागरिकांनी अधिकृत प्रगणकांना सकारात्मक प्रतिसाद द्यावा तसेच, प्रगणकांकडून विचारण्यात येणारी माहिती वेळेत व अचूकपणे उपलब्ध करून देत नागरिकांनी ‘जनगणना २०२७’ प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी यावेळी केले.

## श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर १५ जूनपासून भाविकांसाठी खुले होणार

**दर्शनासाठी ऑनलाइन नोंदणी बंधनकारक**



पिंपरी (दै. संध्या)

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर १५ जून २०२६ पासून भाविकांच्या दर्शनासाठी पुन्हा खुले करण्यात येणार असल्याची माहिती प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी गजानन पाटील यांनी दिली आहे. मंदिर परिसरात सुरू असलेल्या नवीन सभामंडप उभारणी व पायवाट मार्गाच्या कामामुळे मंदिर गेल्या काही महिन्यांपासून दर्शनासाठी बंद ठेवण्यात आले होते.

सन २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आणि भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन मंदिर परिसरात विविध विकासकामे सुरू आहेत. मंदिरासमोरील नवीन सभामंडपाचे काम ३१ मेपर्यंत पूर्ण होणार असून, भाविकांसाठी आवश्यक सुविधा, स्वच्छता आणि गर्दी व्यवस्थापनासाठीची पायाभूत कामे १५ जूनपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. मंदिर प्रशासन, स्थानिक ग्रामस्थ आणि भाविकांच्या सहकार्यामुळे अवघ्या पाच महिन्यांत ही महत्त्वाची कामे पूर्णत्वास आली असून, याबद्दल प्रशासनाने सर्वांचे आभार मानले आहेत.

दर्शनासाठी येताना वैध ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य असेल. भाविकांनी तसेच स्थानिक नागरिकांनी मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन आणि स्थानिक यंत्रणांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रभारी जिल्हाधिकारी गजानन पाटील यांनी केले आहे. मंदिर परिसरातील सर्व कामे अंतिम टप्प्यात असून, भाविकांना अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि सुविधायुक्त दर्शन व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रशासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**दर्शनासाठी विशेष नियम**

- मंदिर व्यवस्थापन समितीचे अधिकृत संकेतस्थळ – https://shreebhimashankar.com
- ५ जून २०२६ पासून ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू होणार.
- दररोज १,००० भाविकांना प्रवेश दिला जाणार.
- नोंदणीकृत भाविकांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध राहणार.
- १५ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत दर्शनाची सुविधा उपलब्ध राहील.

## शहरातील अवैध दारूच्या अड्ड्यांवर कठोर कारवाई होणार

पिंपरी (दै. संध्या)



■ मृतांच्या कुटुंबीयांना महापालिकेकडून १ लाखांची मदत जाहीर

पिंपरी-चिंचवड शहरातील विषारी दारू प्रकरणानंतर प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी कठोर भूमिका घेतली असून, शहरातील अवैध हातभट्टी व दारू विक्रीच्या अड्ड्यांवर बुलडोझर चालवून ते उद्ध्वस्त करण्याचे निर्देश महापौर रवी लांडगे यांनी दिले आहेत. विषारी दारूच्या दुर्दैवी घटनेत मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबीयांची महापौर रवी लांडगे, आमदार उमा खापरे आणि सदाशिव खाडे यांनी भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी पीडित कुटुंबांच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर देण्यात आला. या घटनेतील प्रत्येक मृत व्यक्तीच्या कुटुंबाला पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने प्रत्येकी १ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आली. तसेच शहरातील अवैध दारू विक्री, हातभट्टी आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबवून संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही महापौरांनी दिला. शहरातील नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अवैध व्यवसायांना कोणतीही दया दाखवली जाणार नाही. अशा अड्ड्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनाला आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे महापौर रवी लांडगे यांनी सांगितले.

# राज्यातील सर्व अवैध दारू अड्डे उद्ध्वस्त करणार

पिंपरी (दै. संध्या)

■ मंत्री गिरीश महाजन

■ विषारी दारू प्रकरणातील मृतांच्या कुटुंबियांना राज्य सरकारकडून ५ लाखांची मदत जाहीर



फुगेवाडी विषारी दारू प्रकरणानंतर राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली असून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी केली आहे. यापूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिकेनेही मृतांच्या कुटुंबियांना १ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. तसेच पात्रतेनुसार महापालिकेत नोकरी देण्याच्या दृष्टीनेही सकारात्मक विचार केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

प्रसारमाध्यमांशी बोलताना गिरीश महाजन यांनी राज्यातील अवैध दारू व्यवसायावर कठोर कारवाईचा इशारा दिला. “पिंपरी-चिंचवडसह राज्यातील सर्व ठिकाणचे अवैध दारू अड्डे उद्ध्वस्त केले जातील. अशा बेकायदा धंद्यांना कोणतीही सहानुभूती दाखवली जाणार नाही,” असे ते म्हणाले. यावेळी महापौर रवी लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्यासह अनेक नगरसेवक पदाधिकारी उपस्थित होते.

या प्रकरणात पोलिसांच्या भूमिकेवरही त्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले. “पोलिसांचे अभय असल्याशिवाय असे प्रकार होऊ शकत नाहीत. याआधीही अशा घटना घडल्या असतील, मात्र एकाच दिवशी मोठ्या प्रमाणावर मृत्यू झाल्याने हा प्रकार समोर आला,” असे महाजन यांनी स्पष्ट केले.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्याबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली. “घटना घडल्यानंतर पोलीस आयुक्तांनी घटनास्थळी आणि संबंधित पोलीस ठाण्यात जाऊन परिस्थितीची पाहणी करायला हवी होती. मात्र ते तेथे आले नाहीत. आता या संपूर्ण प्रकरणाचा तपास सीआयडीमार्फत केला जाणार असून प्रत्येकाची चौकशी केली जाईल. चौकशीत कोण वरिष्ठ आणि कोण कनिष्ठ याचा विचार केला जाणार नाही. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई होईल,” असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, विषारी दारू प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपविण्यात आला असून अवैध दारू निर्मिती, विक्री आणि त्यामागील संपूर्ण साखळी उघड करण्यासाठी तपास यंत्रणा कामाला लागली आहे. मृतांचा आकडा वाढल्याने या घटनेने राज्यभरात खळबळ उडाली आहे.

# आम आदमी पार्टीची कार्यकारिणी जाहीर

पिंपरी (दै. संध्या)

आम आदमी पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपदी वैजनाथ शिरसाट यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पक्षाची नवीन शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रभारी प्रकाश जरवाल, प्रदेश कार्याध्यक्ष अजित फटके पाटील, प्रदेश सचिव डॉ. अभिजीत मोरे, प्रदेश संघटन मंत्री सागर पाटील आणि शहराध्यक्ष वैजनाथ शिरसाट यांच्या स्वाक्षरीने ही कार्यकारिणी घोषित करण्यात आली. नवीन कार्यकारिणीत विविध पदांवर अनुभवी आणि सक्रिय कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली असून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे.

शहर कार्यकारिणीत डॉ. अनिल रॉय, चंद्रमणी जावळे, अशोक लांडगे, दत्तात्रय काळजे, यशवंत कांबळे आणि अक्षय माने यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. स्वप्निल जेवळे यांची महासचिवपदी, तर इम्रान खान आणि ज्योती शिंदे यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे. प्रकाश हगवणे यांच्याकडे मुख्य प्रवक्तेपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

संघटन मंत्री म्हणून सचिन थोरात, मंगेश आंबेकर, अखिल शेख, निकित शिंदे, सुनिल शिवशरण आणि डॉ. अमर डोंगरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अजय सिंग, अर्चना सोनवणे, सुरेश भिसे आणि सुखदेव कारळे यांची सहसंघटन मंत्री म्हणून निवड करण्यात आली. याशिवाय सुप्रिया गायकवाड यांची पिंपरी विधानसभा महिला अध्यक्ष, विकी पासोटे यांची युवा आघाडी अध्यक्ष, राहुल मदने यांची ओबीसी आघाडी अध्यक्ष, भारती जाधव यांची महिला बचतगट आघाडी प्रमुख, कुणाल वाक्टे यांची आयटी सेल प्रमुख, शुभम यादव यांची कामगार आघाडी प्रमुख, सुरेश बावनकर यांची उद्योग आघाडी प्रमुख, आंगद मुंगळे यांची रिक्षा संघटना प्रमुख आणि विजय चंडाळ यांची क्रीडा आघाडी प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच शिवकुमार बनसोडे, सीमा बावनकर, संतोष जाधव आणि राज चाकणे यांची कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून आगामी महापालिका निवडणुका आणि शहरातील विविध जनहिताच्या प्रश्नांवर पक्ष अधिक प्रभावीपणे काम करेल, असा विश्वास शहराध्यक्ष वैजनाथ शिरसाट यांनी व्यक्त केला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अधिक मास पौर्णिमेनिमित जानाईदेवी तुळजा भवानीदेवी भेट सोहळा संपन्न

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्रामदेवता जानाईदेवी व तुळजाभवानी देवी व यशवंतराय भेट सोहळा अतिशय धार्मिक विधी मध्ये संपन्न झाला. ग्रामदेवता जानाईदेवी हे जेजुरीकर नागरिक व भाविकांच्या जागृत श्रद्धास्थान असून दर तीन वर्षांनी अधिक मास पौर्णिमेला जेजुरी रेल्वे स्टेशन नजीक असणाऱ्या खोमणे वस्ती येथे तुळजाभवानी व यशवंतराय स्थळावर जानाई देवी व तुळजा भवानीदेवी भेट सोहळा आयोजित केला जातो. तुळजाभवानी जानाई देवीच्या भेटीला येथे अधिक मास पौर्णिमेला भेटण्यासाठी येत असल्याची आख्यायिका सांगितली जाते. रविवार दिनांक 31 रोजी अधिक मास पौर्णिमेनिम्मित सकाळी जानाई भक्त नागू माळी ट्रस्टच्या वतीने जेजुरी येथील देवीचे मानकरी नागनाथ झगडे यांच्या निवास स्थानातून जानाई देवीची पालखी वाजत गाजत काढण्यात आली. जेजुरी रेल्वे स्टेशन रस्त्यावर असणाऱ्या खोमणेवस्ती येथे जाणाई देवीची पूजा, परडी पूजन आरती करून तुळजा भवानी देवीची भेट सोहळा संपन्न झाला. यावेळी मोठ्या संख्येने जानाई भक्त उपस्थित होते. यावेळी भाविकांना खोमणे पाटील परिवाराच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली . या सोहळ्या वेळी जानाई भक्त नागू माळी ट्रस्टचे अध्यक्ष नागनाथ झगडे,तसेच अनिल झगडे, रमेश सोनवणे,दीपक खोमणे,दत्तात्रय खोमणे,शैलेश राऊत,पंडित हरपळे, खोमणे व शेवाळे परिवार ,ग्रामस्थ व मोठ्या संख्येने महिला भाविक उपस्थित होते.

### भाजपच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी संदीप देवकर यांची निवड



पुरंदर (दैनिक संध्या) : भारतीय जनता पक्षाच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील मावडी सुपे येथील संदीप रामचंद्र देवकर यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे.पक्षाच्या संघटनात्मक बांधणीमध्ये सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. या निवडीची घोषणा जिल्हाध्यक्ष शेखर वढणे यांनी केली. भारतीय जनता पक्षाच्या वतीने माजी आमदार संजय जगताप,मा.जिल्हा परिषद सदस्य गंगाराम जगदाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे,तालुका अध्यक्ष संदीप कटके, कैलास इंगळे, सरचिटणीस रविंद्र फुले,रोहिदास कड, अनिल इंगळे, सागर भोसले,नाना जगताप,भैय्या महाजन, बंटी जगताप,महेश इंगळे, विकास इंदलकर आदी उपस्थित होते. संदीप देवकर यांनी यापूर्वी किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष म्हणून कार्य करताना पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी मोठे योगदान दिले. ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क ठेवून विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून पक्षाच्या जिल्हास्तरीय कामकाजाला अधिक बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### अहिल्यादेवी होळकर यांच्या 301 व्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

बारामती (दैनिक संध्या) : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,बारामती येथे दि. २८ व २९ मे २०२६ या दोन दिवसांत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.हे शिबीर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 301 चव्या जयंतीनिमित्त आयोजित केले असल्याने 301 रक्तपिशव्यांचे उदिष्ट ठेवण्यात आले होते.परंतु या शिबिरात महाविद्यालयातील अधिकारी,कर्मचारी,विद्यार्थी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत एकूण 321 रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. सदर रक्तदान शिबिराचे आयोजन डॉ. चंद्रकांत म्हस्के,अधिष्ठाता यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. रक्तदान हे श्रेष्ठ समाजसेवेचे कार्य असून गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे तसेच समाजात रक्तदानाबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे, महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर रक्तदान करून या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे शिबिराला अभूतपूर्व यश मिळाले. अधिकारी,कर्मचारी यांनी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित केले.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.प्रज्ञा भालेराव,उपअधिष्ठाता,डॉ.नकाते, प्राध्यापक व विभागप्रमुख, शरीरविकृती शास्त्र विभाग,डॉ. राजेश उमप,वैद्यकीय अधीक्षक,श्री. नंदकुमार कोकरे,प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.या रक्तदान शिबिरातून संकलित झालेल्या 321 रक्तपिशव्या विविध गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरणार असून,रक्तदानाचा सामाजिक संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यात या उपक्रमाला मोठे यश मिळाले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व रक्तदाते,अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

### चेअरमनपदी सुरेश काकडे तर व्हाईस चेअरमनपदी जितेंद्र पवार बिनविरोध निवड



कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : कोरेगावमुळ येथील विविध विकास कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमनपदी सुरेश काकडे तर व्हाईस चेअरमनपदी जितेंद्र पवार यांची निवड करण्यात आली. तसेच स्विकृत संचालक पदी अशोक शितोळे, रमेश डिंबळे, सुदर्शन कानकाटे यांची निवड करण्यात आली. मावळते चेअरमन बबन कोलते व व्हाईस चेअरमन चारुशीला सरडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने सदर पद रिक्त झाले होते. चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाकरीता निवडणूक घेण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी संतोष तळपे यांनी काम पाहिले. यावेळी सोसायटीचे सचिव हनुमंत जगताप यांनी कामकाजास सहकार्य केले. याप्रसंगी सोसायटीचे संचालक सुरेश भोसले, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक ताराचंद कोलते, संचालक बबन कोलते, प्रमोद बोधे, संजय भोसले, संभाजी शितोळे, अंकुश कड, लोकेश कानकाटे, राजेंद्र शिंदे, गणेश शितोळे, बबई काकडे, चारुशीला सरडे तसेच माजी सरपंच विठ्ठल शितोळे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय काकडे, माजी सरपंच कविता काकडे, माजी उपसरपंच आप्पा शिंदे, माजी उपसरपंच नारायण शिंदे, शहाजी शेलार, संतोष काकडे, जयसिंग भोसले, चंद्रशेखर शितोळे, कचरु कड, मुकिंदा काकडे, सभासद आजी माजी पदाधिकारी आदी उपस्थित होते. सर्व सभासदांना विश्वासात घेऊन पारदर्शक काम करणार असल्याचे मत नवनिर्वाचित चेअरमन सुरेश काकडे व व्हाईस चेअरमन जितेंद्र पवार यांनी केले.

# नीरा येथील मशिदीकडे जाणारा रस्ता खुला करा

**नीरा ग्रामस्थ्यांचा उपोषण व आत्मदहन आंदोलनाचा इशारा**

नीरा (दै. संध्या)



नीरा (ता. पुरंदर ) येथील स्टेशन मशिदीकडे जाणारा पारंपरिक रस्ता रेल्वे प्रशासनाने बंद केल्याचा आरोप करत नीरा येथील मुस्लिम समाजाने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. रस्ता तातडीने खुला न केल्यास उपोषण आणि त्यानंतर आत्मदहन आंदोलन करण्यात येईल, असा इशारा रेल्वे प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे.

याबाबत मुस्लिम समाजाच्या वतीने आज एक पत्रकार परिषद घेत याबाबतची माहिती दिली आहे. मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधींनी विभागीय रेल्वे व्यवस्थापक, पुणे यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, नीरा गावातील स्टेशन मशिद ही सुमारे १२५ वर्षांपासून अस्तित्वात असून परिसरातील शेकडो मुस्लिम बांधव येथे नियमित नमाज पठणासाठी येत असतात. ईद, बकरी ईद तसेच पैगंबर जयंतीसारख्या धार्मिक कार्यक्रमांच्या वेळी हजारो नागरिक या मशिदीत उपस्थित राहतात.

सिटी सर्व्हे नकाशा क्रमांक २९ मध्ये नमूद असलेला सुमारे 65 फूट रुंदीचा सार्वजनिक रस्ता रेल्वे प्रशासनाने अतिक्रमित करून बंद केला आहे. त्यामुळे मशिदीकडे जाणाऱ्या नागरिकांना रेल्वे रुळ ओलांडून जावे लागत असून त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच परिसरातील शेतकरी आणि स्थानिक नागरिकांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा दावा करण्यात आला आहे. यापूर्वीही या प्रश्नाबाबत ग्रामपंचायत आणि स्थानिक नेत्यांच्या मध्यस्थीने रेल्वे प्रशासनाशी चर्चा झाली होती. त्यावेळी पर्यायी रस्ता उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र दोन ते तीन वर्षांचा कालावधी उलटूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली आहे. नीरा रेल्वे स्टेशनाच्या विस्ताराचे काम वेगाने सुरू असताना स्थानिकांच्या रस्त्याचा प्रश्न मात्र प्रलंबितच असल्याने स्थानिकांमध्ये संताप वाढत आहे. या पार्श्वभूमीवर ३ जून २०२६ रोजी स्टेशन मशिदीसमोर उपोषण आंदोलन करण्यात येणार असून, त्यादिवशी तोडगा न निघाल्यास ४ जून रोजी दुपारी २ वाजता आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. दरम्यान, या गंभीर इशाऱ्याची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधित प्रश्नावर तोडगा काढावा, अशी मागणी मुस्लिम समाजासह स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

> स्टेशन मशीदकडे जाणारा, त्याच्या बरोबर नावेच्या डोहाकडे जाणारा हा रस्ता रेल्वेने अडवला आहे. पूर्वी एक लाईन होती तेव्हा लोकांना फारसा त्रास होत नव्हता. मात्र आता सहा लाईन झाल्या आहेत. त्यामुळे मोठ्या अपघाताची श्यक्यता आहे. रेल्वे प्रशासनाने पर्यायी मार्ग देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप त्यावर कारवाई केली नाही. ग्रामस्थ्यांच्या या मागणीला ग्रामपंचायतीचा देखील पाठिंबा आहे. हा प्रश्न मिटला पाहिजे.
>
> **- उपसरपंच, राजेश काकडे**

## रूपालीताई कांडगे यांनी सुरू केला विकास कामांचा धडाका

चाकण (दै. संध्या)

चाकण नगर परिषदेच्या नगरसेविका रूपालीताई राहुलदादा कांडगे यांनी चाकण शहरातील त्यांच्या प्रभागात प्रलंबित कामे मार्गी लावून विकास कामांचा धडाका सुरू केला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे चक्रेश्वर कॉलनीतील रस्त्यावर वाहनांच्या वाढत्या वेगामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. नागरिकांच्या सुरक्षेसाठी केलेल्या मागणीची तात्काळ दखल घेत सभापती रुपालीताई कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गतिरोधक बसविण्यात आले. सुरक्षित प्रवास, शब्दपूर्ती, अंगणवाडी क्र. ७७ ब्राम्हण आळी, चाकणच्या नूतनीकरणासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. चाकण नगरपरिषद प्रभाग क्र. ११ मधील ब्राम्हण आळी येथील अंगणवाडी क्र. ७७ ची दुरूस्ती, रंगकाम आणि नवीन थ्रीट्रॅक खिडक्या बसवण्याच्या कामा संदर्भात महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती रुपालीताई राहुलदादा कांडगे यांनी अंगणवाडी सेविका आणि ठेकेदारांसोबत प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. लवकरच येथील चिमुरड्यांसाठी हवेशीर आणि देखणी अंगणवाडी सज्ज होणार आहे. रुपालीताई कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली चाकणमध्ये विविध विकासकामांचा प्रत्यक्ष आढावा आणि पूर्तता सुरू करण्यात आली आहे. आगरवाडी अंगणवाडी नूतनीकरण, ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम लवकरच मार्गी लावून अंगणवाडी नव्या रूपात चिमुरड्यांच्या सेवेसाठी सज्ज होणार आहे.

## नीरा येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

नीरा (दै. संध्या)



**३०१ वी जयंती उत्साहात साजरी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त पुरंदर तालुक्यातील नीरा येथे त्यांना अभिवादन करण्यात आले. नीरा ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली.

नीरा ग्रामपंचायत कार्यालय परिसरात झालेल्या कार्यक्रमात सरपंच तेजश्री काकडे यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना सरपंच तेजश्री काकडे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी आपल्या कारकिर्दीत लोकाभिमुख, न्यायनिष्ठ आणि आदर्श प्रशासन उभारले. देशभरातील अनेक धार्मिक स्थळांचा जीर्णोद्धार करून समाजकारण व धर्मकारणाचा आदर्श निर्माण केला. त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. देशभरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरी केली जात असताना, नीरा येथेही त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा जागर करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे स्मरण करून समाजहितासाठी कार्य करण्याचा तसेच त्यांच्या आदर्शांचा वारसा जपण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी उपसरपंच राजेश काकडे, नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विक्रम दगडे, माजी सभापती दत्ताजी चव्हाण, माजी उपसरपंच बाळू मोरे, सुदाम बंडगार, सदस्य अनंता शिंदे, सुनील चव्हाण, महेश जेधे, तुकाराम जगताप, महेश धायगुडे, पृथ्वीराज चव्हाण, कर्नलवाडीचे माजी उपसरपंच भरत निगडे, पोलिस पाटील राहुल शिंदे, किरण जेधे, भिवा वळकुंदे यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विक्रम दगडे यांनी केले, तर आभार विजय धायगुडे यांनी मानले.

## संत निरंकारी मिशनचा भव्य सत्संग सोहळा उत्साहात संपन्न

उरण (दै. संध्या)



दिघोडे येथे संत निरंकारी मिशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेला विशाल संत निरंकारी सत्संग कार्यक्रम भक्तिमय वातावरणात आणि उत्साहपूर्ण उपस्थितीत संपन्न झाला. ज्ञानप्रचारक परमपूज्य आदरणीय विश्वास भोसले जी (मुंबई) यांच्या सानिध्यात पार पडलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील शेकडो भक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमस्थळी सेवा दलाच्या स्वयंसेवकांनी अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने वाहतूक नियंत्रण, बैठक व्यवस्था तसेच पिण्याच्या पाण्याची उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून दिली होती. संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता.

सत्संगाची सुरुवात निरंकारी भक्तांनी सादर केलेल्या मधुर भक्तीगीतांनी झाली. त्यानंतर संत महात्म्यांनी अध्यात्म, मानवता, प्रेमभाव आणि समाजातील ऐक्य यावर प्रभावी मार्गदर्शन केले. “ईश्वर एक आहे आणि मानव सेवा हीच खरी भक्ती आहे,” असा मानवतेचा संदेश यावेळी देण्यात आला.

आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात सकारात्मक विचार, सद्गुरूंचे ज्ञान आणि मानवतेची भावना समाजाला योग्य दिशा देऊ शकते, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले. समाजातील वाढते मतभेद, व्यसनाधीनता आणि तणाव दूर करण्यासाठी अध्यात्माची गरज असल्याचे संत महात्म्यांनी सांगितले. या सत्संगामध्ये महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला. अनेक भक्तांनी सत्संगामुळे जीवनात घडलेल्या सकारात्मक बदलांचे अनुभव व्यक्त करत आत्मिक समाधान मिळाल्याची भावना मांडली. यावेळी संत निरंकारी मिशनच्या आगामी सामाजिक आणि आध्यात्मिक उपक्रमांची घोषणाही करण्यात आली. शांतता, शिस्त आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांना महाप्रसाद वितरणाने करण्यात आली.


कार्यक्रमास आयोजक दत्ताराम पाटील (संत निरंकारी सत्संग उरण सेक्टर 19 संयोजक,), कुलदीप जयवंत म्हात्रे (संत निरंकारी सत्संग दिघोडे ), काशिनाथ कासकर, चंद्रकांत म्हात्रे, हरिदास पाटील, सचिन पाटील आदी सह परिसरातील भक्त गण मोठ्या संख्येने उपस्थित होते

## नगरसेवक नितीन गावडे यांचा वाढदिवस अनोख्या पध्दतीने साजरा

लोणी काळभोर (दै. संध्या)



पुणे महानगरपालिकेतील हडपसर - सातववाडीचे प्रभाग क्रमांक १६ शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे नगरसेवक नितीन गावडे यांचा वाढदिवस नुकताच अतिशय सुंदर कल्पनेतून व अनोख्या पध्दतीने त्यांच्या प्रभागातील नागरिकांनी ‘छत्रपती शिवाजी’ हा चित्रपट नागरिकांना दाखवून साजरा केला. या सामाजिक कार्याचे खूपच कौतुक केले जात असून प्रथमच पुणे महानगरपालिकेतील नगरसेवकाचा वाढदिवस जनतेने हातात घेतला होता. वाढदिवसानिमित्ताने त्यांच्या प्रभागातील नागरिकांनी वनगरसेवक नितीन गावडे यांनी कसलाही डामडौल न करता अतिशय साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा केला. प्रभागातील नागरिकांनी प्रभागातील नागरिकांसाठी छत्रपती शिवाजी हा चित्रपट दाखवून एक जनतेसमोर आदर्श दाखवून दिला आहे. हडपसर येथील एका मॉल मध्ये पाच स्क्रीनवर हा चित्रपट दाखविण्यात आला. याचा सर्व खर्च नागरिकांनी केला.



## स्वामी समर्थ मठात चंदन उटी लेप व मोगरा महोत्सव उत्साहात

जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी येथील ऐतिहासिक होळकर तलावाशेजारी असलेल्या श्री स्वामी समर्थ मठात पौर्णिमेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या संपूर्ण मूर्तीला सुगंधी चंदन उटीचा लेप लावण्यात आला. तसेच संपूर्ण गाभारा मोगऱ्याच्या फुलांनी सजवून मोगरा महोत्सव साजरा करण्यात आला. चंदन उटी लेप व मोगऱ्याच्या सुगंधाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भरून गेला होता. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री स्वामी समर्थ महाराजांचे दर्शन घेतले व पूजन केले. यावेळी आरती, नामस्मरण आणि भक्तिगीतांच्या कार्यक्रमांमुळे मठ परिसरात अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

याप्रसंगी मठाचे अध्यक्ष गणेश मोरे, उपाध्यक्ष माऊली खोमणे, नितीन कदम, विश्वस्त कबीर मोरे, सदानंद शिंदे, ज्ञानेश्वर मोरे, अभिषेक झाडे, निलेश देशपांडे गुरुजी, महेश कदम, संदीप घोरपडे आणि धनंजय केळकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मठातील पदाधिकारी, विश्वस्त मंडळ व स्वामी भक्तांनी परिश्रम घेतले. पौर्णिमेनिमित्त आयोजित या विशेष सोहळ्याने भाविकांना भक्ती आणि अध्यात्माचा आनंददायी अनुभव दिला.

## लोणी काळभोरमध्ये आई-मुलगा अटकेत

लोणी काळभोर (दै. संध्या): पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारूमुळे मृतांची संख्या वाढत असतानाच लोणी काळभोर पोलिसांनी कारवाई करत मानवी आरोग्यास घातक ठरणारी रासायनिक ताडी तयार करणाऱ्या आई-मुलाला जेरबंद केले आहे. घटनास्थळावरून तयार ताडी, घातक स्फटिक पदार्थ आणि मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करून दोघांना अटक केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार याप्रकरणी सिद्धांत सुरेश भाले (वय २२) व मुक्ताबाई सुरेश भाले (वय ५१, रा. गारुडी वस्ती, शितळादेवी नगर, लोणी काळभोर) यांना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी महिला पोलीस हवालदार कविता संपत साळवे यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम सुरू असताना पोलिसांना गारुडी वस्ती येथे एका पत्र्याच्या घरात रासायनिक पदार्थ मिसळून ताडी तयार करून तिची विक्री केली जात आहे. अशी माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून कारवाई केली असता सिद्धांत व मुक्ताबाई भाले हे निळ्या रंगाच्या टबमध्ये पिवळसर स्फटिक पदार्थ मिसळून ताडी तयार करताना आढळून आले.

## जेजुरी गडावर देवसंस्थानच्यावतीने राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी

जेजुरी (दै. संध्या)



ऐतिहासिक जेजुरी नगरीच्या शिल्पकार राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 301 व्या जयंतीनिमित्त श्री खंडोबा मंदिर महाद्वार पायरी मार्गावर असणाऱ्या पूर्णाकृती पुतळाच्या ठिकाणी श्री मार्तंड देवस्थान विश्वस्त मंडळ,पालखी सोहळ्याचे खांदेकरी मानकरी ग्रामस्थ पुजारी सेवक वर्ग तसेच अहिल्यादेवी भक्त यांच्या वतीने अभिवादन करून राजमाता अहिल्यादेवींचा व श्री खंडेरायाचा जयघोष करीत पुष्पवृष्टी व भंडारा उधळण करण्यात आली. जेजुरी गडावरील पायरी मार्गावर श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने चार वर्षांपूर्वी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा भव्य पुतळा उभारण्यात आला आहे.दरवर्षी जेजुरी देवसंस्थान ,जेजुरी नगरपरिषद,ग्रामस्थ मंडळ, व पुजारी वर्गाच्या वतीने राजमाता अहिल्यादेवी यांची जयंती साजरी केली जाते. रविवार दिनांक 31 रोजी जेजुरी गडाच्या पायरी मार्गावर देवसंस्थानचे अध्यक्ष ॲड.विश्वास पानसे, मंगेश घोणे,ॲड. पांडुरंग थोरवे, पोपट खोमणे तसेच जेजुरी नगर परिषदेच्या नगरसेविका भक्ती कोरपड, योगिता दोडके, स्वरूपा खोमणे, सुरेश उबाळे, अमोल माळवदकर, संपत कोळेकर, ॲड. सुभाष नाझीरकर, अहिल्याभक्त संतोष खोमणे, देवसंस्थांनाचे अधिकारी व कर्मचारी व ग्रामस्थांनी अहिल्यादेवींच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन केले. तसेच देवाचे लेण असणारा भंडारा उधळून पुष्पवृष्टी करण्यात आली. ऐतिहासिक काळात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी जेजुरी गडाचा जीर्णोद्धार करून लाखो खंडोबा भक्तांसाठी 16 एकर जागेत होळकर तलाव तसेच भाविकांना कुलधर्म कुलाचार नुसार धार्मिक विधी करण्यासाठी सात एकर जागेत चिंचेच्या बागेची निर्मिती केली होती.तेव्हा पासून आजपर्यंत लाखो भाविक या ऐतिहासिक वास्तूंचा लाभ घेत आहेत.जेजुरी गडाच्या शिल्पकार असणाऱ्या राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचे जतन व्हावे यासाठी दरवर्षी जेजुरी गडावर जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी राजमाता अहिल्यादेवीनी लोककल्याणार्थ व हिंदू धर्माकरिता केलेली विविध कामे तसेच विविध मंदिरांचे जिर्णोद्धार याबद्दल माहिती दिली.

# सुबोध भावे अभिनीत 'श्री बाबा नीब करोरी महाराज'ला प्रतिसाद

## प्रेक्षकांकडून आध्यात्मिक गाभ्याचे आणि दमदार अभिनयाचे कौतुक



पुणे (दै. संध्या)

२९ मे २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या 'श्री बाबा नीब करोरी महाराज' या चित्रपटाला प्रेक्षकांकडून अत्यंत उबदार प्रतिसाद मिळत आहे. प्रेक्षक या चित्रपटातील आध्यात्मिक खोली, भावस्पर्शी कथाकथन आणि प्रामाणिक अभिनयाचे विशेष कौतुक करत आहेत. आदरणीय नीम करोली बाबा यांचे जीवन, त्यांची शिकवण आणि त्यांचा वारसा अत्यंत भक्तिभावाने व अस्सलतेने मोठ्या पडद्यावर मांडल्याबद्दल सोशल मीडियावर प्रेक्षक या चित्रपटाची भरभरून प्रशंसा करत आहेत.

नीम करोली बाबा यांची भूमिका साकारणारे अभिनेते सुबोध भावे यांच्यावर विशेष कौतुकाचा वर्षाव होत आहे; त्यांच्या शांत, तल्लीन आणि मनाचा ठाव घेणाऱ्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आपल्या दमदार अभिनयासाठी आणि चरित्रपटांमधील भूमिकांसाठी ओळखल्या जाणाऱ्या भावे यांनी या आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वात केलेले रूपांतर प्रेक्षकांच्या मनाला खोलवर भिडले आहे.

ही भूमिका स्वीकारण्याबाबत यापूर्वी बोलताना सुबोध भावे यांनी सांगितले होते, "जेव्हा शरदजींना हा चित्रपट बनवायचा होता, तेव्हा ते गेल्या ४-५ वर्षांपासून त्यावर काम करत होते. त्यांनी यापूर्वीही कलाकार आणि तंत्रज्ञांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला होता, पण तो यशस्वी झाला नाही. जानेवारी २०२५ मध्ये, एका लेखक मित्राद्वारे मला समजले की त्यांना मला भेटायचे आहे. जेव्हा आमची भेट झाली, तेव्हा त्यांनी मला बाबांवर चित्रपट बनवण्याबाबतची त्यांची संकल्पना (व्हिजन) सांगितली आणि ही भूमिका मीच साकारवी अशी इच्छा व्यक्त केली. त्यावेळी मला त्यांच्याबद्दल फारशी माहिती नव्हती. मी केवळ त्यांचे एक छायाचित्र पाहिले होते आणि त्यांच्याबद्दल वरकरणी ऐकले होते. शरदजींच्या माध्यमातूनच मला बाबांचा आणि त्यांच्या जीवनाचा खऱ्या अर्थाने परिचय झाला."

एका संताची भूमिका साकारण्याबाबत विचार व्यक्त करताना भावे यांनी या गोष्टीवर भर दिला होता, "मला नेहमीच असे वाटते की, जेव्हा आपण एखाद्या संतावर चित्रपट बनवत असतो, तेव्हा अभिनेता त्या पात्राची निवड करत नाही; तर ते पात्रच अभिनेत्याची निवड करते. माझ्या बाबतीतही, मला असे वाटते की बाबांनीच मला त्यांची भूमिका साकारण्यासाठी निवडले."


या अभिनेत्याने दिग्दर्शक शरद सिंग ठाकूर यांची अनेक वर्षांची निष्ठा आणि संशोधन यालाही यशाचे श्रेय दिले. "शरदजींनी बाबांचे जीवन समजून घेण्यात अनेक वर्षे घालवली—त्यांच्यासोबत प्रत्यक्ष राहिलेल्या लोकांना ते भेटले, इतकेच नव्हे तर त्यांनी बाबांच्या कुटुंबीयांशीही संवाद साधला. त्या वर्षांमध्ये त्यांनी केलेल्या प्रत्येक अभ्यासाचा आणि जमा केलेल्या प्रत्येक तपशीलाचा त्यांनी माझ्याशी संवाद साधताना उल्लेख केला. जेव्हा तुमचा दिग्दर्शक इतक्या सखोल तयारीसह तुमच्यासमोर येतो, तेव्हा तुम्हाला इतरत्र कुठेही पाहण्याची किंवा शोधाशोध करण्याची गरज उरत नाही. तुम्ही केवळ त्यांचे म्हणणे ऐकता आणि ती सर्व माहिती आपल्या अंतर्मनात सामावून घेता." या भूमिकेकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन स्पष्ट करताना भावे यांनी नमूद केले होते, "एक अभिनेता म्हणून, तुम्हाला अनेकदा 'अभिनय' करण्याची इच्छा असते; परंतु इथे मात्र तुम्हाला काहीच करावे लागत नाही. जे काही करणे आवश्यक असते, ते बाबाच करतात—तुम्हाला फक्त समर्पित राहायचे असते आणि स्वतःला त्यांच्या चरणी पूर्णपणे अर्पण करायचे असते. या चित्रपटात जे काही घडले आहे किंवा साकारले गेले आहे, ते सर्व त्यांच्याच कृपेने माझ्या माध्यमातून घडले आहे, असे मला मनापासून वाटते. जर लोकांनी माझ्या अभिनयाचे कौतुक केले, तर तो बाबांचा आशीर्वाद आहे; आणि जर काही चुका झाल्या असतील, तर त्या माझ्या आहेत."

शरद सिंह ठाकूर यांनी दिग्दर्शित केलेला 'श्री बाबा नीब करोरी महाराज' हा चित्रपट नीम करोली बाबा यांचे जीवन, त्यांची शिकवण आणि त्यांचा आध्यात्मिक वारसा यांचा वेध घेतो. श्रद्धा, करुणा आणि आंतरिक शांती याचा त्यांचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणे, हा या चित्रपटाचा मुख्य उद्देश आहे. प्रेक्षकांनी या चित्रपटातील भक्तीमय वातावरण आणि भावनिक प्रामाणिकपणाचे विशेष कौतुक केले आहे; अनेक प्रेक्षकांनी या चित्रपटाला एक 'आध्यात्मिकदृष्ट्या अंतर्मुख करणारा आणि भावस्पर्शी अनुभव' असे संबोधले आहे.

या चित्रपटात हितेन तेजवानी, समीक्षा भटनागर, मोहित गुप्ता, हेमंत पांडे, आरती नागपाल, वर्षा माणिकचंद, हरदीप कौर, अनिरुद्ध दवे आणि गरिमा अग्रवाल या कलाकारांनीही भूमिका साकारल्या आहेत. बलराम गर्ग, बलवीर सिंह, शरद सिंह ठाकूर, खडग सिंह गौर आणि नीलम सिंह यांनी निर्मित केलेला हा चित्रपट, 'PC Jeweller' आणि 'BSR Film Productions' यांच्या सहयोगाने 'Anisha Films International' द्वारे सादर करण्यात आला आहे. या चित्रपटाच्या अखिल भारतीय प्रदर्शनाची (All-India Release) जबाबदारी 'First Film Studios LLP' कडे सोपवण्यात आली आहे.

---

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अधिक मास पौर्णिमेनिमित्त खंडोबा देवाला 51 किलो अनारसेचा नैवद्य

जेजुरी (दैनिक संध्या) : अधिक मास पौर्णिमा निमित्त महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या श्री खंडेरायाला बत्ताशे पासून बनविलेले आकर्षक दागिने घालण्यात आले. तसेच 51 किलो अनारसेचा नैवेद्य दाखविण्यात आला. कुलदैवत खंडोबा मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री मार्तंड देवसंस्थान व पुजारी सेवक वर्गाच्या वतीने अधिक मास पौर्णिमेचे औचित्य साधून देवासमोर 51 किलो अनारसे, बत्ताशे, मैसूर यांची आरास करण्यात आली.तांब्याच्या निरंजनामध्ये दीप लावून सजावट करण्यात आली. यावेळी श्री मार्तंड देवसंस्थानचे अध्यक्ष अ‍ॅड. विश्वास पानसे व विश्वस्त मंगेश घोणे पुजारीसेवक वर्गाचे गणेश आगलावे, पप्पू सातभाई, वैभव लांघी, सुमित गुरव, मंगेश बारभाई, प्रशांत सातभाई, संदिप घोरपडे, राजु वाईकर उपस्थित होते.

### पुणे जिल्हा रहिवाशी सेवा संघाच्या वतीने 'विद्यार्थी गुण-गौरव सोहळा'

मुंबई (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा रहिवाशी सेवा संघ, मुंबई यांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यासाठी 'विद्यार्थी गुण-गौरव सोहळा २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा रविवार, ५ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर येथे पार पडणार आहे. या कार्यक्रमात ५ वी ते १२ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार असून त्यांना मोफत वह्यांचे वाटप देखील करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देत त्यांच्या यशाचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती संघाच्या वतीने देण्यात आली. कार्यक्रमासाठी मा. श्री. अँड. धनराज वंजारी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. निलमताई पोतले-वढद्युले तसेच मुंबई विद्यापीठाचे सिनेट सदस्य किसन सावंत यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी २७ जूनपर्यंत आपल्या मार्कलिस्टची झेरॉक्स प्रत आयोजकांकडे जमा करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम विशेषतः पुणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला असून विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघाचे अध्यक्ष बाबासाहेब ठाकूर, उपाध्यक्ष रोहिदास टाव्हरे, सचिव दत्तात्रय वाळुंज आणि खजिनदार महेंद्र गडगे यांनी केले आहे.

### मनोज कांबळे मुंबई महापालिकेचे 30 वे सचिव



मुंबई (दैनिक संध्या) : मुंबई महानगरपालिका सचिव श्रीमती मंजिरी देशपांडे ३१ मे २०२६ रोजी नियतवयोमानानुसार कार्यालयीन वेळेनंतर सेवा निवृत्त झाल्या आहेत. महानगरपालिका सचिव पदाला वैधानिक दर्जा आहे. मनोज कांबळे १ जून २०२६ रोजी सचिव पदाची सुत्रे हाती घेणार आहेत. मुंबई महानगरपालिका पहिले सभागृह ४ सप्टेंबर १८७३ रोजी भरले होते. १५३ वर्षाच्या इतिहासातील मनोज कांबळे ३० वे महानगरपालिका सचिव आहेत. मनोज कांबळे मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत २३ फेब्रुवारी १९९३ रोजी दाखल झाले होते. त्यानंतर, सन २००० मध्ये वरिष्ठ चिटणविशी सहाय्यक, सन २००४ मध्ये सहाय्यक महानगरपालिका सचिव (कनिष्ठ), सन २००७ मध्ये सहाय्यक महानगरपालिका सचिव (वरिष्ठ), सन २०२२ मध्ये महानगरपालिका उप सचिव आणि १ जून २०२६ रोजी महानगरपालिका सचिव पदावर नेमणूक झाली आहे.ते सचिव पदावरुन फेब्रुवारी २०२७ रोजी सेवा निवृत्त होणार आहेत.महानगरपालिका सचिव पदाची जबाबदारी मोठी आहे.मा.महापौर,उप महापौर,सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते, स्थायी समिती अध्यक्ष, वैधानिक समित्यांचे अध्यक्ष, विशेष समित्यांचे अध्यक्ष, सभागृहातील कामकाज, समित्यांच्या सभा, त्यांचे इतिवृत्त, महापौर निधी आणि महापौर निधी समिती यांचे कामकाज, कार्यालयातील कर्मचारी - अधिकारी, महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका उप आयुक्त, सहाय्यक आयुक्त, पत्रकार, नागरिक, नगरसेवक, मंत्रालयीन कामकाज इत्यादींचा समन्वय साधून कामकाज करण्याची जबाबदारी आहे.

---

# ताथवडे, पुनावळे, वाकड सेवा रस्त्यांचे काम प्राधान्याने मार्गी लागणार - आ.शंकर जगताप

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या बैठकीत सेवा रस्त्यांच्या अंतिम टप्प्यातील कामाला गती देण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश

पिंपरी (दै. संध्या)

ताथवडे, पुनावळे आणि वाकड या परिसरातील तीन महत्त्वाच्या सेवा रस्त्यांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे सक्त आदेश केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी दिले. याचबरोबर, ताथवडे आणि पुनावळे येथील अंडरपासमधील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेऊन हे अंडरपास रुंद करण्याच्या सूचनाही त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. या भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकार सकारात्मक असून अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश गडकरी यांनी दिल्याची माहिती चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी दिली.

राष्ट्रीय महामार्गांवरील प्रलंबित कामांविषयी शनिवारी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुण्यामध्ये बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत उपस्थित रहात आमदार शंकर जगताप यांनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वरील (पुणे पश्चिम बायपास) वाहतूक कोंडी आणि पायाभूत सुविधांकडे आमदारांनी लक्ष वेधले.



"ताथवडे, पुनावळे आणि वाकड परिसरातील अंतर्गत वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी सेवा रस्ते आणि अंडरपासचे रुंदीकरण अत्यंत आवश्यक आहे. या अत्यंत महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना तातडीने काम सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे या भागातील नागरिकांना आणि आयटी क्षेत्रातील नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल."
- शंकर जगताप, आमदार (चिंचवड विधानसभा)

आमदार शंकर जगताप याबाबत म्हणाले सयाजी अंडरपास, भुमकर चौक, ताथवडे अंडरपास, पुनावळे अंडरपास, पवना नदी क्रॉसिंग, किवळे जंक्शन आणि मामुर्डी अंडरपास या परिसरांमध्ये सध्याच्या भुयारी मार्गांची क्षमता अतिशय कमी आहे. परिणामी, सेवा रस्त्यांचे काम तातडीने पूर्णत्वाला नेणे गरजेचे आहे. हीच मागणी गडकरी साहेबांकडे मांडली आहे. सेवा रस्त्यांची गरज आणि नागरिकांच्या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने या रस्त्यांचे काम पूर्ण करण्याचे सक्त निर्देश गडकरी यांनी दिले आहेत.

पुनावळे, वाकड, किवळे आणि रावेत या प्रमुख जंक्शन्सवरून रोज लाखो वाहनांची आणि जड मालवाहतुकीची ये-जा सुरू असते. वाहतुकीचा ताण लक्षात घेता या ठिकाणी अतिरिक्त बॉक्स स्ट्रक्चर्स आणि नवीन अंडरपास बांधण्याबाबत देखील केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून हिरवा कंदील मिळाला आहे.

---

# सोमवारी गुणपत्रक व प्रमाणपत्र वाटप

## सकाळी शाळांना, दुपारी विद्यार्थ्यांना वितरण

पुणे (दै. संध्या)




महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेची एकत्रित गुणपत्रक आणि प्रमाणपत्र सोमवारी ( ता. १) दुपारी तीन वाजल्यानंतर माध्यमिक शाळांमार्फत विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहेत. त्यापूर्वी माध्यमिक शाळांना विभागीय मंडळामार्फत सकाळी अकरा वाजता प्रमाणपत्र दिली जाणार आहेत, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी दिली.

राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये दहावीची परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल आठ मे रोजी ऑनलाइन पद्धतीने अधिकृत संकेतस्थळांवर जाहीर करण्यात आला.

दरम्यान, उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सोमवारी परीक्षेचे गुणपत्रक तथा प्रमाणपत्र आणि तपशीलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप केले जाणार आहे. नऊ विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांना सोमवारी सकाळी अकरा वाजता प्रमाणपत्र वाटप केले जाईल. त्याच दिवशी दुपारी तीन वाजता महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना गुणपत्रकाचे वाटप केले जाणार आहे, असे राज्य मंडळाने सांगितले आहे.

---

# दरोड्याच्या तयारीत असणाऱ्या दोघांना शस्त्रासह अटक; २ जण पळाले, मुक्ताईनगर पोलिसांची कारवाई

जळगाव (दै. संध्या)



मुक्ताईनगर पोलीस ठाणे हद्दीत पहाटे बुलढाणा जिल्ह्याच्या सीमेवरील पुलावर एका वाहनाचा किरकोळ अपघात झाला. त्यावेळी परिसरात गस्त घालत असलेल्या मुक्ताईनगर पोलीस ठाण्याच्या सेकंड मोबाईल पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना पाहताच वाहन चालकासह दोन जण घटनास्थळावरून पळून गेले. वाहनातील अन्य दोन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी त्यांच्या हालचालींबाबत समाधानकारक माहिती दिली नाही.

वाहनाची झडती घेतली असता एक देशी बनावटीचे पिस्तूल (कट्टा), दोन जिवंत काडतुसे, एक दोरी, लोखंडी रॉड, दोन मोबाईल फोन तसेच एक बनावट क्रमांक प्लेट जप्त करण्यात आली. तपासादरम्यान फरार झालेला वाहन चालक प्रशांत उर्फ परशुराम गायकवाड असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच्याविरुद्ध बीड, अहमदनगर, बुलढाणा, पुणे आदी जिल्ह्यांमध्ये सुमारे १८ गंभीर गुन्हे दाखल असून त्याच्यावर यापूर्वी एमपीडीए अंतर्गत कारवाई होऊन त्यास बीड कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले होते.

---

# नीरेत मोफत आरोग्य शिबीरास उत्स्फुर्त प्रतिसाद

## पुरंदर तालुका भाजपा पूर्व मंडलने आयोजित केले आरोग्य शिबीर, सुमारे १६६ रूग्णांनी घेतला लाभ

नीरा (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील नीरा येथे पुरंदर तालुका भाजपा पुर्व मंडलच्या वतीने व उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, समर्थ युवा फाउंडेशन व महामंत्री राजेश पांडे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत भव्य आरोग्य तपासणी शिबीर शनिवारी ( दि.३०) आयोजित करण्यात आले होते. या शिबीराचा सुमारे १६६ रूग्णांनी लाभ घेतला.दरम्यान आरोग्य शिबीरास महिलांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला असल्याची माहिती भाजपाचे पुर्व मंडलचे तालुकाध्यक्ष संजय निगडे व सरचिटणीस उमेश चव्हाण यांनी दिली.

नीरा ( ता.पुरंदर) येथे शनिवारी झालेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबीरात रक्तातील सर्व घटक तपासणी , रक्तदाब तपासणी, रक्तातील साखर तपासणी,कोलेस्ट्रॉल तपासणी, डोळ्यांची तपासणी (मोतीबिंदू, काचबिंदू),दातांची तपासणी, महिलांसाठी स्तन कर्करोग तपासणी आदी तपासण्या व्हॅन मधून करण्यात आल्या. या तपासण्यांचा सुमारे १६६ जणांनी लाभ घेतला.पुरंदर तालुक्यातील सर्व मंडलातील प्रमुख गावांत जाऊन मोफत आरोग्य तपासणी करणार आहे




यावेळी पुरंदरचे माजी आ.अशोकराव टेकवडे, महाराष्ट्र राज्य पंचायत राज्यचे प्रदेशाध्यक्ष गणेशकाका जगताप, जि.प.सदस्य हरीभाऊ लोळे, भाजपा डॉक्टर सेलचे अध्यक्ष सुमित काकडे, समर्थ पतसंस्थेचे चेअरमन राजेश चव्हाण, श्रमवीर उत्कर्ष पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र काकडे, वीर देवस्थानचे विश्वस्त सुनिल धुमाळ, कल्याणराव जेधे, गुळूंचे वि.का.सोसा.चे माजी चेअरमन संजय निगडे,वर्धमान शहा, वैजयंती शहा यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

हे शिबीर यशस्वी होण्याकरिता भाजपाचे पुर्व पुरंदरचे तालुकाध्यक्ष संजय निगडे, सरचिटणीस उमेश चव्हाण, बाळासाहेब भोसले, योगेंद्र माने, माणिकराव चोरमले, हरीभाऊ कुदळे यांच्यासह कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

आरोग्य तपासणी करणारी व्हॅन महामंत्री राजेश पांडे यांनी उपलब्ध करून दिली. महागड्या असलेल्या व सर्वसामान्य नागरिकांना व महिलांना न परवडणा-या तपासण्या या व्हॅनमधून खेडेगावांतील नागरिकांच्या मोफत तपासण्या केल्या जात असून भाजप सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत असल्याचे माजी आ. अशोकराव टेकवडे यांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### धडाकेबाज कारवाई : 24 लाखांचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत, आरोपी जेरबंद

कवठे येमाई (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील शिरूर पोलिस स्टेशनच्या डी.बी. पथकाने उत्कृष्ट तपासकौशल्य दाखवत तब्बल २४ लाख रुपये किंमतीचा चोरीचा मुद्देमाल हस्तगत करून एका आरोपीस अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरातील घरफोडीच्या गुन्ह्याचा यशस्वी उलगडा झाला आहे. शिरूर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शिरूर तालुक्यातील आनंद सोसायटी परिसरातील एका घरातून फेब्रुवारी २०२६ दरम्यान सोन्या-चांदीचे दागिने, चांदीची भांडी व इतर मौल्यवान वस्तू चोरीस गेल्या होत्या. याप्रकरणी फिर्यादी यांनी शिरूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपी विलास आनंदा खोसडे (रा. भायेगाव, ता. मुखेड, जि. नांदेड) याचा ठावठिकाणा मिळाल्यानंतर पोलिस पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्याच्याकडून सुमारे ७ किलो १३४ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने व वस्तू तसेच ३६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकूण २४ लाख रुपये किंमतीचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल,अपर पोलिस अधीक्षक डॉ. शुभमकुमार सो, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले आणि पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांच्यासह डी.बी. पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या यशस्वी कारवाईबद्दल शिरूर पोलिसांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### टोमॅटो, कारली, गवार, गाजर व चक्री भोपळ्याची भरपूर आवक



चाकण (दैनिक संध्या) : खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये टोमॅटो, कारली, गवार, गाजर, चक्री भोपळा व हिरव्या मिरचीची भरपूर आवक झाली. फळभाज्या व पालेभाज्यांचे भाव तेजीत राहिले. एकूण उलाढाल ४ कोटी ६० लाख रुपये झाली. चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार २५० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ७०० ते १,६०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,४०० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,५०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. लसणाला १२ हजार रुपये कमाल भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३१० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयांपासून ५ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

### सुरक्षेसाठी अखेर लोखंडी बॅरिकेड्स

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील गुंजाळवाडी येथे कल्याण - अहिल्यानगर महामार्गावर वारंवार घडणाऱ्या बस अपघातांनंतर आणि नागरिकांच्या सातत्यपूर्ण तक्रारींनंतर प्रशासनाला अखेर जाग आली आहे. नुकत्याच घडलेल्या बस अपघातानंतर खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने अखेर धोकादायक वळणावर लोखंडी बॅरिकेड्स बसवून प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पावले उचलली आहेत. यामुळे रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनांचा वेग नियंत्रणात राहण्यास आणि अपघातांची शक्यता कमी होण्यास मोठी मदत होणार आहे. सध्या रस्त्यालगत लोखंडी संरक्षक बॅरिकेड्स बसविण्याचे काम सुरू असून त्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, नागरिकांनी केवळ बॅरिकेड्सवर समाधान न मानता या ठिकाणी वेगमर्यादा फलक, रिफ्लेक्टर आणि स्ट्रीट लाईटची सुविधाही उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. या मार्गावर अनेक ठिकाणी तीव्र वळणे असल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः रात्रीच्या वेळी व पावसाळ्यात अपघाताचा धोका अधिक असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. अलीकडे झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाल्यानंतर या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले जाऊ लागले. स्थानिकांच्या मते, महामार्गावरील इतर धोकादायक ठिकाणीही अशाच सुरक्षाविषयक उपाययोजना केल्यास भविष्यातील अपघात टाळण्यास मदत होईल.

### डॉक्टरांचा अनोखा फंडा

पुणे (दैनिक संध्या) : महापालिकेच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयातील काही डॉक्टरांच्या कामकाजाच्या पद्धतीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. नियमित वेळेपेक्षा केवळ दोन तास सेवा देऊन पूर्ण वेतन घेत असल्याचे समोर आले आहे. यामुळे या वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या कमला नेहरू रुग्णालयातील रुग्णसेवांवर परिणाम झाला आहे. मंगळवार पेठेतील कमला नेहरू रुग्णालयाच्या बाजूला हे वैद्यकीय महाविद्यालय आहे. रुग्णालयात तातडीची वैद्यकीय सेवेपासून स्त्रीरोग व प्रसूती, अस्थिव्यंगोपचार, बालरोग, हृदयरोग, मेडिसिन, नेत्रोपचार, सामान्य शस्त्रक्रिया आदी विभाग आहेत.

# पुनावाला कुटुंबाचा सिरम युनियन व कामगागारांच्यावतीने सत्कार

लोणी काळभोर (दै. संध्या)



सामाजिक बांधिलकी ठेऊन समाजातील सर्व स्तरातील लोकांसाठी मदत करण्यासाठी नेहमीच पुढे असलेल्या पुनावाला कुंटुबाचा सिरम् एम्प्लॉईज युनियनच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कंपनीचे चेअरमन डॉ. सायरस पुनावाला, सी.ई.ओ. आदर पुनावाला व मास्टर सायरस पुनावाल यांनी सत्कार स्विकारला. यावेळी सिरम् एम्प्लॉईज युनियनचे संस्थापक अध्यक्ष सचिन गोपीनाथ तुपे, एच. आर. डायरेक्टर महेंद्र ईंगे, प्रवीण गरकल युनियनचे अध्यक्ष अजित भितांडे, उपाध्यक्ष अतुल कदम, सचिव अजित खैरे, खजिनदार सचिन गायकवाड, सदस्य प्रवीण घुले, गिरीश मोरे उपस्थित होते.

यावेळी सिरम् एम्प्लॉईज युनियन तसेच सर्वच कामगाराच्या वतीने पुनावाला कुटुंबाची एक पेन्टिंग व कंपनीचा लोगो असलेली सोन्याची भेट वस्तु तसेच विलु पुनावाला हॉस्पिटल साठी सुमारे ११ लाख रूपयेचा धनादेश देऊन कुंटुबाला गौरविण्यात आले.

धनादेश स्विकारताना वेल्फेअर मेडिकल फाउंडेशनचे अध्यक्ष व विश्वस्त डॉक्टर किरण शहा व्यवस्थापकीय विश्वस्त डॉक्टर भूषण माणगावकर उपस्थित होते.

जागतिक स्तरावर उत्तम व मोठ्या प्रमाणात लस उत्पादन निर्मिती करून जगभरात नावलौकिक निर्माण करणाऱ्या सिरम् इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया कंपनी जुन २०२६ मध्ये जवळपास ६० वर्षांहून अधिक कार्यकाल पूर्ण करत आहे. कंपनीमधील साधारण ११ हजारांहून अधिक कामगार व त्यांच्या संपुर्ण कुटुंबांचे पालकत्व स्वीकारणारे व सामाजिक बांधिलकी ठेवुन समाजातील सर्व स्तरातील लोकांसाठी सढळ हाताने भरघोस मदत करणाऱ्या पुनावाला कुंटुबाचा समाजहिताची जाणीव ठेवून विविध सामाजिक उपक्रमांमध्ये नेहमीच सक्रिय असतो. समाजातील गरजू घटकांना मदत, पर्यावरण संवर्धन, शिक्षण, आरोग्य व जनजागृती यांसारख्या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य हे कुंटुब करत आहे. क्रिडा क्षेत्रात चांगले खेळाडू घडविण्यासाठी त्यांना वेळोवेळी प्रोत्साहन देऊन मदत करण्यात नेहमी हे कुंटुब अग्रेसर आहे. समाजासाठी निःस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या या कुंटुबामुळे समाजात सकारात्मक बदल घडत असुन यामुळे आम्हाला समाजसेवेची प्रेरणा मिळत असल्याची भावना सिरम् एम्प्लॉईज युनियनचे संस्थापक अध्यक्ष सचिन गोपीनाथ तुपे यांनी यावेळी व्यक्त केली.

तसेच आदर पुनावाला क्लीन सिटी या उपक्रमाअंतर्गत संपूर्ण पुणे शहर व परिसरातील कचरा उचलला जात असुन पुणे शहर स्वच्छ ठेवण्यासाठी या कुंटुबाचा मोलाचा सहभाग आहे .शहर व ग्रामीण भागातील पाण्याची टंचाई व पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता ग्रामीण भागातील वाडया ,वस्तीवर स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असुन या योजनेचे ग्रामीण भागातुन कौतुकच होत आहे.

यावेळी वेल्फेअर मेडिकल फाउंडेशनच्या वतीने सिरम युनियनचे पदाधिकारी व कामगार बांधवांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. वेल्फेअर मेडिकल फाउंडेशनच्या वतीने व्यवस्थापकीय विश्वस्त डॉक्टर भूषण माणगावर यांनी सांगितले की वेल्फेअर मेडिकल फाउंडेशनच्या अंतर्गत विलू पुनावाला मेमोरिअल हॉस्पिटल मध्ये समाजाची सेवा करण्याच्या आणि गरजू व्यक्तींना मदत करण्याच्या आमच्या उदात्त कार्याला बळ मिळेल तसेचया हॉस्पिटलमध्ये दर्जेदार आरोग्य सेवा देण्याचे आमचे उद्दिष्ट पुढे नेण्यासाठी तुमचे योगदान मोलाचे आहे. तुमच्या या पाठिंब्यामुळे आणि एकजुटीबद्दल वेल्फेअर मेडिकल फाउंडेशन मनापासून धन्यवाद देत आहे.

## पीएमआरडीएचा मास्टर स्ट्रोक : गायरान जमिनी प्राधिकरणाच्या ताब्यात

*हक्काच्या घराचे स्वप्न पाहणाऱ्यांचे संसार होणार उध्वस्त : खेड तालुक्यातील स्थिती*

चाकण (दै. संध्या)





पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) आता आपल्या हद्दीतील जमिनींच्या हस्तांतरणाची प्रक्रिया अत्यंत धडाकेबाज पद्धतीने पूर्ण केली असून, खेड तालुक्यातील महाळुंगे इंगळे, खराबवाडी, निघोजे आणि चऱ्होली या प्रमुख गावांसह परिसरातील मोठ्या क्षेत्राचे महसूल रेकॉर्ड थेट पीएमआरडीएच्या नावावर वर्ग करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष आदेश काढून या जमिनींचा ताबा प्राधिकरणाकडे सोपवल्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून गायरान जमिनींवर घरे बांधून आणि व्यवसाय करून स्थिरावलेल्या नागरिकांच्या पायाखालची जमीनच सरकली आहे. चाकण लगतच्या मौजे खराबवाडीसह परिसरातील गट क्रमांक २/१ आणि २/२ सारख्या मोठ्या क्षेत्रातील ‘गायरान’ आणि ‘सरकार’ असा उल्लेख असलेले कब्जेदार सदरीचे नाव बदलून, आता त्या जागी थेट 'महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए)' यांचे नाव दाखल झाले आहे. विशेष म्हणजे, ही प्रशासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात आली असून, आता या जमिनी पूर्णपणे पीएमआरडीएच्या कायदेशीर ताब्यात गेल्या आहेत.

या जमिनी आता प्राधिकरणाच्या ताब्यात आल्यामुळे, येथील गायरान क्षेत्राचा वापर भविष्यात विविध सामाजिक आणि पायाभूत विकासात्मक प्रकल्पांसाठी केला जाणार आहे. प्राधिकरणाने या जागांचा ताबा घेण्यासाठी आता आक्रमक धोरण अवलंबले असून, जमिनीवरील सर्व प्रकारची अतिक्रमणे लवकरात लवकर हटवून जागा मोकळी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून या सरकारी जागेवर राहणारे नागरिक "आमची घरे कायदेशीर होतील किंवा आपल्याला मालकी हक्क मिळेल," या आशेवर दिवस काढत होते. मात्र, न्यायालयाच्या आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या या थेट आदेशामुळे या रहिवाशांना मोठा धक्का बसला आहे. प्रशासनाच्या या कठोर भूमिकेमुळे आता खेड तालुक्यातील हजारो कुटुंबांचे संसार उघड्यावर येण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

## भरदिवसा तरुणीवर ब्लेड हल्ला; परिसरात खळबळ

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील आळेफाटा परिसरात एक अत्यंत थरारक आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. बुधवारी भरसकाळी एका २० वर्षांच्या तरुणीवर तिच्याच 'लिव्ह-इन पार्टनर'ने ब्लेडने वार करून तिला गंभीर जखमी केले. "माझ्यासोबत लातूरला परत चल," या एका मागणीला तरुणीने नकार दिल्यामुळे भररस्त्यात हा हल्ला करण्यात आला.या घटनेमुळे आळेफाटा बस स्थानक परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या प्रकरणी आळेफाटा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जखमी तरुणीचे नाव पूजा सुभाष पांचाळ (वय 20 वर्ष) असे आहे. पूजा ही लातूर येथील रहिवासी असलेला आरोपी नागेश भगवान थोरात रा. ओसवाडी, ता. रेनापूर, जि. लातूर याच्यासोबत 'लिव्ह-इन रिलेशनशिप' मध्ये राहत होती. त्यांना दोन लहान मुलेही आहेत. मात्र, नागेशच्या दारूच्या भीषण व्यसनाला आणि सततच्या त्रासाला कंटाळून पूजा मुलांसह लातूर सोडून जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथे राहण्यास आली होती. ती येथील १४ नंबर परिसरातील एका कला केंद्रात नृत्यांगना म्हणून काम करत होती, आणि काम करून आपल्या मुलांचा सांभाळ करत होती. बुधवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास पूजा तिच्या एका मैत्रिणीसोबत आळेफाटा एस.टी. बस स्थानक परिसरातील कपड्यांच्या दुकानासमोर बॅग खरेदी करण्यासाठी आली होती.

## पसायदानातील विचार देतात नवी दिशा : चैतन्य महाराज देगलूरकर



आळंदी (दै. संध्या)

“संत ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानाच्या माध्यमातून केवळ स्वतःसाठी नव्हे, तर संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. पसायदान हा वारकरी संप्रदायाचा आत्मा असून विश्वबंधुत्व, सद्भावना आणि मानवतेचा संदेश देणारा मंत्र आहे. या विचारांचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. पसायदानातील प्रत्येक ओवी समाजाला नवी दिशा देणारी आहे,” असे प्रतिपादन चैतन्य महाराज देगलूरकर यांनी केले. पुरुषोत्तम मासानिमित्त श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे श्रीगुरु निवृत्तीनाथ महाराजांच्या दरबारात सुरू असलेल्या हरिनाम महोत्सवात भागवत महाराज साळुंखे लिखित ‘पसायदान हे!’ या ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. चैतन्य महाराज देगलूरकर पुढे म्हणाले, “आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनात संत ज्ञानेश्वरांचा समतेचा, करुणेचा आणि परस्पर प्रेमाचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. अशा ग्रंथांमुळे नव्या पिढीला संतवाङ्मयाचा परिचय होऊन अध्यात्माकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी मिळते.”

## अवैध दारू हातभट्ट्यांवर शिवसेनेचा तुफान हल्लाबोल

*प्रमोद नाना भानगिरे यांच्या नेतृत्वात शेकडो लिटर बनावट गावठी दारूचा साठा उध्वस्त*

पुणे (दै. संध्या)



पुणे शहरात विषारी दारूमुळे १५ नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर संपूर्ण शहरात संतापाची लाट उसळलेली असतांना शिवसेनेने हडपसर परिसरातील अवैध दारू व्यवसायाविरोधात थेट रस्त्यावर उतरून आक्रमक कारवाई केली. हडपसर मतदारसंघातील कृष्णानगर, तरवडे वस्ती पोलीस चौकीच्या अगदी पाठीमागे तसेच साठे वस्ती परिसरात खुलेआम सुरू असलेल्या गावठी व बनावट दारूच्या हातभट्ट्यांवर शिवसेनेने तुफान हल्लाबोल चढवत धडक मोहीम राबवली.

शिवसेना पुणे शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी अवैध दारूभट्ट्यांवर कारवाई करत हातभट्ट्या फोडून टाकल्या आणि बनावट गावठी दारूचा शेकडो लिटरचा अवैध साठा उध्वस्त केला. यावेळी प्रमोद नाना भानगिरे यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत, "सर्वसामान्य नागरिकांना या अवैध दारू हातभट्ट्या आणि त्यावरील राजरोसपणे सुरू असलेले व्यवहार स्पष्टपणे दिसतात, मग पुणे पोलिसांना ते का दिसत नाहीत?" असा थेट सवाल उपस्थित केला.

भानगिरे यांनी पुढे आरोप केला की, शहरातील अनेक भागांमध्ये वर्षानुवर्षे सुरू असलेले हे अवैध धंदे पोलिसांच्या माहितीसह सुरू आहेत अशी जनतेमध्ये भावना निर्माण झाली आहे. पोलिसांच्या वरदहस्ताशिवाय अशा प्रकारे खुलेआम दारूभट्ट्या चालू शकत नाहीत, असा गंभीर आरोपही त्यांनी केला. विषारी दारूमुळे निष्पाप नागरिकांचे जीव जात असताना संबंधित यंत्रणा नेमकी काय करत होती, याचे उत्तर पुणे पोलिसांनी जनतेसमोर द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

हडपसर परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून अवैध दारू विक्री, हातभट्ट्या आणि इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात शिवसेना सातत्याने आवाज उठवत असून विषारी दारूकांडात १५ नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतरही अवैध दारू विक्री सुरू राहणे ही अत्यंत गंभीर बाब असून यापुढे अशा दारू माफियांना कोणतीही दया दाखवली जाणार नाही, असा इशारा शिवसेनेने दिला,पुणे शहरात अवैध दारू व्यवसाय कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही आणि नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या दारू माफियांविरोधात अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या कारवाईवेळी प्रमोद नाना भानगिरे यांच्यासमवेत शिवसेनेचे अनेक पदाधिकारी, शाखाप्रमुख आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेनेच्या या धडक कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून अवैध दारू व्यवसायाविरोधातील लढा आणखी तीव्र होण्याचे संकेत मिळाले आहेत.

# “प्रत्येक गल्लीत कॅमेरा, प्रत्येक नागरिकाला सुरक्षा”

बारामती (दै. संध्या)





**बारामती शहर पोलिसांचे आवाहन**

बारामती शहर व परिसरात वाढत्या वाहन चोरी, चैन स्नॅचिंग, घरफोडी आणि मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी बारामती शहर पोलिसांनी नागरिक, ग्रामपंचायती, हौसिंग सोसायट्या, व्यापारी संघटना आणि सामाजिक संस्थांना सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे महत्त्वपूर्ण आवाहन केले आहे.

माननीय अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती शहर पोलिसांकडून प्रमुख चौक, रस्ते, संवेदनशील ठिकाणे आणि शहरातील प्रवेश मार्गांवर नियमित नाकाबंदी, वाहन तपासणी, रात्रीची गस्त, पेट्रोलिंग आणि गुन्हे प्रतिबंधात्मक कारवाया राबविण्यात येत आहेत. तरीही आधुनिक काळात सीसीटीव्ही यंत्रणेशिवाय गुन्हेगारांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे आणि गुन्ह्यांचा जलद तपास करणे आव्हानात्मक ठरत असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, सध्या गुन्हेगार मुख्य रस्ते टाळून गल्ल्या, बोळ, वस्ती भाग आणि कमी वर्दळीच्या मार्गांचा वापर करून गुन्हे करत आहेत. अनेकदा काही मिनिटांत परिसर सोडून दिल्याने त्यांचा मागोवा घेणे कठीण होते. अशा परिस्थितीत सीसीटीव्ही कॅमेरे आरोपींची ओळख पटविणे, हालचालींचा मागोवा घेणे आणि चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहेत.

दरम्यान, गुणवडी गावाने या संदर्भात आदर्श निर्माण केला असून संपूर्ण गाव सीसीटीव्ही कव्हरेजखाली आणण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. गावातील प्रमुख रस्ते, चौक, प्रवेशद्वारे आणि महत्त्वाच्या ठिकाणी कॅमेरे बसविले जात असल्याने गुन्हेगारांवर प्रभावी प्रतिबंध निर्माण होणार आहे. भविष्यात चोरी अथवा अन्य गुन्हे करण्यापूर्वी गुन्हेगारांना अनेकदा विचार करावा लागेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

बारामती शहर पोलिसांनी मळद, पिंपळी, मेडद, डोरलेवाडीसह शहर परिसरातील सर्व गावांमध्ये तसेच प्रमुख चौक, मुख्य रस्ते, प्रवेशद्वारे, बाजारपेठा, व्यापारी संकुले, गृहनिर्माण संस्था आणि निवासी भागांमध्ये सीसीटीव्ही नेटवर्क उभारण्याची गरज अधोरेखित केली आहे.

पोलिसांनी नागरिकांना आपल्या घर, दुकान, कार्यालय आणि परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आवाहन केले असून, प्रत्येक सोसायटीने सामूहिक सुरक्षा यंत्रणा उभारावी, ग्रामपंचायतींनी सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यास प्राधान्य द्यावे आणि व्यापारी संघटनांनी बाजारपेठांमध्ये कॅमेरे उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे म्हटले आहे.

"सीसीटीव्ही बसविणे हा खर्च नसून कुटुंब, मालमत्ता आणि भविष्यातील सुरक्षेसाठी केलेली गुंतवणूक आहे. पोलीस प्रत्येक ठिकाणी पोहोचू शकतात; मात्र सीसीटीव्ही प्रत्येक क्षणी पहारा देऊ शकतो," असे आवाहन बारामती शहर पोलिसांनी केले आहे.

"एक कॅमेरा बसवा... आपल्या कुटुंबाचा, व्यवसायाचा आणि शहराच्या सुरक्षेचा मजबूत पहारेकरी उभारा," असा संदेश देत पोलिसांनी नागरिकांच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा व्यक्त केली आहे.

